मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १३५ ■ गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# कॉपी प्रकरणांवर राज्य मंडळाचा कारवाईचा बडगा; मुंबई महापालिका शाळेतील ३६६ विद्यार्थी पहिल्यांदाच देणार सीबीएससी दहावी परीक्षा!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** दहावी आणि बारावी परीक्षांतील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान' राबवले जात असताना, दुसरीकडे मुंबईतील मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत सुरू असलेल्या सीबीएससी संलग्न शाळांमधील ३६६ विद्यार्थी यंदा पहिल्यांदाच दहावीच्या सीबीएससी बोर्ड परीक्षेला सामोरे जाणार आहेत. दहावीची परीक्षा १७ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.



**ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे सुरू :** "महानगरपालिकेच्या १० शाळांमधील ही पहिली तुकडी असून, या विद्यार्थ्यांचा निकाल भक्कम लागावा यासाठी मुंबई महानगरपालिका प्रशासनानं कंबर कसली आहे. विद्यार्थ्यांकडून नियमितपणे सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जात आहेत. गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, इंग्रजी आणि माहिती तंत्रज्ञान या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याशिवाय काही खासगी सीबीएससी शाळांमधील तज्ज्ञ शिक्षकांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत आहे. उत्तरपत्रिका कशा लिहायच्या, वेळेचे योग्य नियोजन कसे करायचे, प्रश्न नीट समजून कसे सोडवायचे, यासाठी ऑनलाइन मार्गदर्शन सत्रे सुरू करण्यात आली आहेत," अशी माहिती पालिका अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे यांनी दिली.

**विशेष उपक्रमांमुळे निकालाची टक्केवारी वाढली :** "महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती, तामिळ, तेलगू आणि कन्नड अशा आठ भाषांमध्ये शिक्षण दिलं जाते. इथं एसएससी, सीबीआय, आयसीएसई आणि आयबी अशा चार मंडळांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. एसएससी विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आलेल्या विशेष उपक्रमांमुळे निकालाची टक्केवारी ९३ टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, आता हाच फॉर्म्युला सीबीएससी विद्यार्थ्यांसाठी वापरण्यात येत आहे," असं डॉ. अविनाश ढाकणे यांनी सांगितलं.

**गुणवत्ता आणि पारदर्शकतेवर भर :** एकीकडे मुंबई महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी पहिल्यांदाच सीबीएससी बोर्ड परीक्षेला सामोरे जात असताना, त्यांच्यासाठी विशेष तयारी, मार्गदर्शन आणि सराव सुरू आहे. तर दुसरीकडे, राज्य मंडळाकडून कॉपी प्रकरणांवर कठोर कारवाई करून परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परीक्षा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या असताना, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्सुकता वाढली असून, प्रशासनानेही कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी सर्व पातळ्यांवर तयारी अंतिम टप्प्यात आणली आहे.

**कॉपी प्रकरणांवर राज्य मंडळाचा कडक कारवाईचा बडगा :** दहावी आणि बारावी परीक्षांमध्ये कॉपीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान' राबवलं जात आहे. याअंतर्गत परीक्षा केंद्रांवर अचानक तपासण्या, भरारी पथकांच्या भेटी, ड्रोनद्वारे निगराणी, पोलीस बंदोबस्त आणि केंद्रांबाहेर चित्रीकरण असे कडक उपाय करण्यात येत आहेत.

तरीही काही ठिकाणी गैरप्रकार उघडकीस आल्यानं मंडळानं कठोर भूमिका घेतली आहे. राज्यभरातील दहावीची ३१ आणि बारावीची ७६ अशी एकूण १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक केंद्रे छत्रपती संभाजीनगर विभागातील आहेत.

फेब्रुवारी–मार्च २०२५च्या दहावी परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई आणि लातूर विभागांतील ३४ केंद्रांवर गैरप्रकार आढळून आले होते. त्यापैकी ३१ केंद्रांवर थेट कारवाई करण्यात आली आहे.

राज्य मंडळानं पत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढं ज्या केंद्रांवर पुन्हा गैरप्रकार आढळतील, त्या केंद्रांची कायमची मान्यता रद्द केली जाईल.

# शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट भाजपच्या पथ्यावर; पुणे महापालिका निवडणुकीत भाजपला ४३ टक्के मते

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीचा थेट फायदा महापालिका निवडणुकीत भाजपला झाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहेत. महापालिका निवडणुकीच्या एकूण मतदानात ४३.१० टक्के मतदान एकट्या भाजपला झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला २३.९९, काँग्रेसला ८.४८, शिवसेना ६.९९, तर शिवसेनेला (ठाकरे) ४.२० टक्के मतदान झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला केवळ ३.८६ टक्के मतदान झाले आहे.महापालिकेकडून मतमोजणीनंतरची अंतिम आकडेवारी निश्चित करण्यात आली आहे. त्यातून ही माहिती समोर आली आहे.शहरातील ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी गेल्या आठवड्यात मतदान झाले. त्यामध्ये अ, ब, क, ड अशा प्रत्येक जागेसाठी सुमारे ३५ लाख ५१ हजार मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला.महापालिकेसाठी ५२ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला असून, मतदारांना प्रत्येकी ४ मते द्यायची होती. एकूण ७४ लाख ६३ हजार ८२४ मतदान झाले. त्यात ३२ लाख १८ हजार ६६४ मतदान (४३.१ टक्के) भाजपला झाले आहे. त्यामुळे भाजपचे सुमारे ११९ नगरसेवक निवडून आले आहेत. त्या खालोखाल सर्वाधिक १७ लाख ८६ हजार १७२ मतदान राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) झाले आहे. तिसऱ्या क्रमांकाची ६ लाख ३२ हजार ९२४ मते काँग्रेसला मिळाली आहेत. शिवसेनेला ५ लाख २२ हजार १३८ मते मिळाली असून, शिवसेना (ठाकरे) पक्षाला ३ लाख ११ हजार ६६९ मते मिळाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला २ लाख ८८ हजार २०० मते मिळाली आहेत. उर्वरित मतांमध्ये इतर प्रमुख राजकीय पक्ष, अपक्ष, तसेच नोटाला मिळालेल्या मतांचा समावेश आहे.




या निवडणुकीत निवडणूक लढविणाऱ्या काही मोठ्या राजकीय पक्षांपेक्षाही 'नोटा'ला अधिक मतदान झाले आहे. पुण्यात 'नोटा'ला एकूण २ लाख २१ हजार २०९ मतदान झाले आहे, तर सर्व अपक्ष उमेदवारांना १ लाख ४७ हजार २७८ मतदान झाले आहे.

# नशाही नशा हैं, २१ लाखांचा गुटखा जप्त

**दैनिक युवक आधार**

**नाशिक, प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील मुंबई आग्रा महामार्गावर सायने शिवारात पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कारवाई केली. यात सुमारे २१ लाख ६० हजार रुपये किमतीचा गुटखा, जर्दा आणि तंबाखूचा साठा तसेच पाच लाख रुपांचा ट्रक असा एकूण २६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई सोमवारी (दि. १९) पहाटेच्या सुमारास करण्यात आली.पोलिसांनी संशयावरून ट्रक (एमपी १३, झेडडब्ल्यू १७०५) अडवून तपासणी केली. त्यात राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा मोठा साठा आवळून कंपन्यांचा ४० गोण्या गुटखा, ८ गोण्या पानमसाला तसेच मोठ्या प्रमाणावर सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आली. याप्रकरणी ट्रकचालक शोकीनखों इदेखौं याच्याविरुद्ध अन्न व औषध प्रशासन कायदा तसेच भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान, अवैध गुटखा वाहतुकीमागील मुख्य सूत्रधार कोण, हा साठा कुठून आला आणि कुठे वितरण होणार होता, याचा तपास सुरू आहे. राज्यात गुटखाबंदी असतानाही अशा प्रकारे सर्रास वाहतूक सुरू असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे मालेगावात गेल्या वर्षभरात कोट्यवधी रुपयांचा गुटखा साठा जप्त केला असूनही अवैध व्यापार थांबत नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.




# रामदास गायधने यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार



**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते :** साहित्य व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पनवेलचे ज्येष्ठ साहित्यिक रामदास गायधने यांना "इंटरनॅशनल ॲचिव्हर्स अवॉर्ड" प्रदान करण्यात आला.

पत्रकार दिनानिमित्त शिर्डी येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघातर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २:३० वा. हॉटेल शांतीनिकेतन येथे हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिर्डी साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी गौरक्ष गाडिलकर, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, ब्युटीक्विन प्रिती चौधरी, संत अवधूत गिरी महाराज व जादूगार श्री डी. लाल उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर रामदास गायधने यांना आकर्षक चषक व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले.सरकारी HIL (हिल इंडिया) कंपनीत गुणनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत राहिल्यानंतर गायधने यांनी निवृत्तीनंतर साहित्य-सेवेला वाहून घेतले. यापूर्वीही त्यांना "साहित्यरत्न", "काव्यगौरव", "शब्दरत्न", "ज्ञानरत्न", राज्यस्तरीय काव्यगौरव २०२४, राज्यस्तरीय काव्यभूषण २०२५ इत्यादी मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच त्यांच्या "शब्दकाव्याची सय" या काव्यसंग्रहाला "पद्मश्री स्मिता पाटील शब्दपेरा काव्यसंग्रह पुरस्कार" प्राप्त झाला आहे.आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या या सन्मानामुळे रामदास गायधने यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पशुपालकांसाठी अनुदानित योजनांची मोठी संधी

### पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा जिल्हा उपआयुक्त डॉ. तुषार बावणे यांचे लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** जानेवारी (जिमाका) पशुसंवर्धन विभाग वाशिम अंतर्गत सन २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीत दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये वाशिम जिल्ह्याचा समावेश असून ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र पशुपालकांना www.vmdpp.com या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. दुग्ध व्यवसाय वाढीस चालना देण्यासाठी तसेच पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

तरी सदर योजनेचा जास्तीत जास्त शेतक-यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय वाशिम डॉ तुषार बावणे यांनी केले आहे.

**योजनेतील विविध घटक पुढीलप्रमाणे :**

१. ५० टक्के अनुदानावर उच्च उत्पादन क्षमता असलेली गाय म्हैस वाटप

२. ७५ टक्के अनुदानावर उच्च उत्पादन क्षमता असलेल्या भ्रूणांचे प्रत्यारोपण केलेली गाभण कालवड वाटप

३. २५ टक्के अनुदानावर प्रजनन पूरक खाद्य वाटप

४. २५ टक्के अनुदानावर फेंट आणि एसएनएफ वर्धक खाद्यपुरवठा वाटप

५. ५० टक्के अनुदानावर कडबा कुट्टी यंत्र वाटप

६. १०० टक्के अनुदानावर बहुवार्षिक चार पिके ठोंबे वाटप

७. २५ टक्के अनुदानावर मुरघास वाटप

योजनेतील अटी व शती www.vmdpp.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक पशुपालकांनी वेळेत ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक : भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक २०२६ दिनांक ५ फेब्रुवारी रोजी होणार असून या निवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारांनी बुधवारी उत्स्फूर्त व जल्लोषात उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे तसेच राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली ही अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून ढोल-ताशांच्या गजरात व घोषणांसह रॅली काढण्यात आली. ही रॅली पनवेल तहसीलदार कार्यालयात पोहोचून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. मंगळवारी केळवणे जिल्हा परिषद मतदारसंघातून मंगेश वाकडीकर व वावंजे जिल्हा परिषद मतदारसंघातून कमला देशेकर यांनी, वावंजे पंचायत समिती गणासाठी आरती कुणाल काटे, चिंध्रण पंचायत समिती गणातून अंकुश खेर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातील उमेदवारांनी आज (बुधवार, दिनांक २१ जानेवारी) अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करताना आमदार प्रशांत ठाकूर, राज्य परिषद अरुणशेठ भगत, नगरसेवक व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, दशरथ म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, प्रवीण खंडागळे, विश्वजीत पाटील, ज्ञानेश्वर घरत, योगेश लहाने, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, यतीन पाटील, विनोद घरत, सुनील माळी, अनेश ढवळे, शिल्पा म्हात्रे, अपेक्षा जाधव, लीना पाटील, गौरी पाटील, प्रियांका गाताडे, सुजाता घरत, अंकिता घरत, दिक्षा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रायगड जिल्हा परिषदेतील नेरे जिल्हा परिषद गणातून आत्माराम बाळू भस्मा, पाली देवद गणातून प्राची अमित जाधव, पळस्पे गणमधून हर्षदा अतुल घरत, वावेघर गणातून अनन्या अविनाश गाताडे, वडघर मधून सोनाली प्रकाश जितेकर, तर गव्हाण जिल्हा परिषद मतदार संघातून निकिता निलेश खारकर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. पनवेल पंचायत समिती मधील नेरे पंचायत समिती गणातून वर्षा सचिन केवारे, आदई पंचायत समिती भूपेंद्र सदाशिव पाटील, पालीदेवद वैशाली प्रविण सावंत, विचुंबे निलम प्रमोद भिंगारकर, पळस्पे गणातून राजेंद्र हरिचंद्र पाटील, कोन मधून योगिता योगेश लहाने, पोयंजे गणामधून अस्मिता अनंत पाटील, वावेघर संघातून राजू पाटील, करंजाडे रंजना सदाशिव वास्कर, वडघर मधून मनिषा गजानन पाटील, वहाळ गणामधून वितेश त्रिंबक म्हात्रे, गव्हाण गणातून जिज्ञासा मनोहर कोळी, केळवणे मधून शीतल अनंता माळी तर आपटा पंचायत समितीमधून मयूर शेलार यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले. उमेदवारी अर्जाची छाननी २२ जानेवारी रोजी होणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान तर ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार असून व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

**पनवेल मधील जिल्हा परिषदेचे गण**

वावंजे, नेरे, पाली देवद, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे

**पंचायत समितीचे गण**

वावंजे, चिंध्रण, नेरे, आदई, पालीदेवद, विचुंबे, पळस्पे, कोन, पोयंजे, वावेघर, करंजाडे, वडघर, वहाळ, गव्हाण, केळवणे, आपटा

# अपंग मुलीला सोडून पालकाचे पलायन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** एका ३ वर्षीय लहान अपंग मुलीला तिच्या पालकाने पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सोडून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन फलाट क्र. ३ वर कर्तव्यावर असणाऱ्या पुरुष होमगार्डला एका लहान मुलीच्या रडण्याचा आवाज आला. त्याने तात्काळ जाऊन पाहणी केली असता अंदाजे ३ ते ४ वर्षीय गहूवर्ण रंगीय तसेच अंगात निळ्या रंगाचा टी-शर्ट व ,ब्राऊन रंगाची फुल नाईट पॅन्ट घातलेली लहान मुलगी विनापालक रडत असताना मिळून आली. या मुलीच्या पालकांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाही. या मुलीला विचारपूस केली असता तिने फक्त तिचे नाव शिवानी एवढेच सांगितले. त्यानंतर त्या होमगार्डने मुलीला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. रेल्वे पोलिसांनी सिसिटीव्ही द्वारे या घटनेची पाहणी केली असता तिच्या पालकाने बालकाची देखभाल, सांभाळ करणे गरजेचे आहे हे माहिती असताना देखील त्या लहान मुलीचा संपुर्णतः परित्याग करून त्यास उघडयावर टाकून सोडून निघून गेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिसांनी पालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या आरोपी व्यक्तीबाबत कोणास काही माहीती मिळताच पनवेल रेल्वे पोलीस ठाणे दुरध्वनी क्रं. ०२२२७४६७१२२,९८२१४२५४०४ किंवा महिला पोलीस हवा एस.एस. बोराटे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.




## हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त जय अवलिया क्रीडा मंडळाच्या वतीने दणदणीत कबड्डीचे सामने!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** हिंदूहृदयसम्राट, सरसेनापती शिवसेना प्रमुख मा. श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जय अवलिया क्रीडा मंडळ, गिव्हा कुटे यांच्या वतीने भव्य आणि दणदणीत कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील युवकांना आपली क्रीडा कौशल्ये सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार असून, कबड्डी या पारंपरिक खेळाला नवे बळ मिळणार आहे.

या स्पर्धेत ६० किलो आतील गटातील थरारक कबड्डी सामने रंगणार आहेत. बलवान संघांमधील झुंज, चपळ खेळाडूंची चपळाई आणि प्रेक्षकांचा जल्लोष यामुळे गिव्हा कुटे परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण होणार आहे.



स्पर्धेचे भव्य उद्घाटन दिनांक २३ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या क्रीडा व युवकांसाठीच्या प्रेरणादायी विचारांना अभिवादन करत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या दणदणीत कबड्डी सामन्यांचा आनंद घेण्यासाठी परिसरातील सर्व क्रीडाप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जय अवलिया क्रीडा मंडळ, गिव्हा कुटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भीम आर्मीच्या गोंदिया जिल्हा कार्यकारिणीची घोषणा; बहन मायावती यांच्या वाढदिवसानिमित्त जनक नगर येथे कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी (गोंदिया) :** येथील जनक नगर, गड्डाटोली स्थित भीम आर्मीच्या जिल्हा कार्यालयात १५ जानेवारी २०२६ रोजी बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख माननीय सुश्री बहन कुमारी मायावती यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगल प्रसंगी भीम आर्मीचे संस्थापक तथा नगीना लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाई चंद्रशेखर आझाद यांच्या आदेशान्वये आणि जिल्हाध्यक्ष प्रशांत गजभिये यांच्या नेतृत्वात भीम आर्मीच्या जिल्हा कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष प्रशांत गजभिये यांनी संघटनेच्या विस्तार आणि समाजहिताच्या कार्यावर भर दिला. घोषित करण्यात आलेल्या नवनियुक्त जिल्हा कार्यकारिणीत खालील



पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे:

जिल्हाध्यक्ष: प्रशांत गजभिये

जिल्हा उपाध्यक्ष: विनय मेश्राम

महासचिव: संतोष शेंडे

कोषाध्यक्ष: अंकित फुले

सचिव: कुणाल मेश्राम

जिल्हा सदस्य: आदर्श चतरे, आकाश उकेय, सनी यादव.

सदर कार्यकारिणीच्या निवडीबद्दल नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे संघटनेतर्फे अभिनंदन करण्यात आले. तसेच येत्या काही दिवसांत जिल्हयातील उर्वरित तालुका, शहर, गाव आणि प्रभाग कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमाला भीम आर्मीचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुमशेत गावात बळीराम नारायण कडू परिवाराची दहशत, पोलीस प्रशासनाने शांतता प्रस्थापित करावी, ग्रामस्थांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी माणगाव :** कुमशेत गावात सर्व गावकऱ्यांनी मिळून गुण्यागोविंदाने रहावे, सर्व सण विनाविघ्न साजरे करावेत अशी कुमशेत गावातील गावकऱ्यांची इच्छा असते, परंतु गावातील एका कुटुंबामुळे गावातील रहिवासी तळावाखाली, भयभीत व त्रस्त आहेत.गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिस प्रशासनही अपयशी ठरलेले आहे.कुमशेत गावातील बळीराम नारायण कडू,नरेश बळीराम कडू यांची पत्नी, नम्रता नरेश कडू तिची मुलगी भूमी नरेश कडू यांनी सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत पत्रा शेड व बांधकाम करुन लाकडी बांबुनी रस्ता अडवून ठेवला आहे.अशामुळे भांडण व मारामारी करण्यास बळीराम कडू परिवार स्वतःहून हाणामारीवर येत असतात.देवीची पालखी परंपरेनुसार ज्या रस्त्यावरुन जात असते तो रस्ताच अनधिकृत बांधकाम करुन अडवलेला आहे.सर्व संबंधित प्रशासनाला




अर्ज करुनही कुमशेत गावातील ग्रामस्थांना न्याय मिळालेला नाही.स्थानिक पोलीस स्टेशनलाही बळीराम कडू कुटुंबियांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती, परंतु पोलीस व सरपंच यांचेही बळीराम कडू ऐकत नाही, जास्त प्रमाणात गुंडगिरी व दहशत निर्माण झालेली आहे, त्यामुळे ग्रामस्थ दहशतीखाली आहेत.बळीराम कडू याने सुरेश शाबाजी कडू,त्यांची दोन मुलं, सुरेश श्रीपती कडू व त्यांची दोन मुलं,राम गोपाळ कडू, प्रकाश गोपाळ कडू,आसाराम भाऊ दळवी, चंद्रकांत आबाराम दळवी, विवेक आबाराम दळवी, सुबोध रामचंद्र चव्हाण,दयाराम बाळाराम कडू, जनार्दन नारायण कडू, मंगेश राजाराम कडू, संतोष चंद्रकांत कडू,प्रितेश प्रविण दळवी यांच्यावर विनाकारण खोट्या केसेस दाखल केल्या आहेत.त्यांच्या या अडेलतट्टू धोरणामुळे गावातील शांतता भंग झालेली आहे.बळीराम कडू हे सेवा निवृत्त पोलिस पाटील आहेत त्याचा ते गैरफायदा घेत आहेत.असेच होत राहिले तर एक दिवस उद्रेक होईल, त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारी व महसूल प्रशासन यांनी या अनधिकृत प्रकरणात गांभीर्याने लक्ष देऊन रस्ता मोकळा करुन द्यावा व गावात शांतता प्रस्थापित करावी अशी कुमशेत गावातील ग्रामस्थांची मागणी आहे.यासंभीत गावकऱ्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कुमशेत ग्रामस्थांच्या वतीने पत्र देण्यात आले आहे.

# व्यापारी संघटनेची धुरा तरुणांच्या हाती;हसनाबाद व्यापारी महासंघाची नवी दमदार कार्यकारणी बिनविरोध घोषित

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/ राजु शिंदे :** भोकरदन येथील बाजारपेठेतील व्यापाऱ्यांच्या संघटनेत नवचैतन्य येत असून व्यापारी महासंघाची धुरा आता तरुणांच्या हाती सोपवण्यात आली आहे. दिनांक २० जानेवारी रोजी मराठवाडा व्यापारी महासंघाचे ज्येष्ठ नेते हस्तीमलजी बंब यांच्या उपस्थितीत हसनाबाद व्यापारी महासंघाची नूतन कार्यकारणी



बिनविरोध जाहीर करण्यात आली.कार्यक्रमास सरपंच सुरेश लाठी, उपसरपंच जनार्दन खरात, गणपत माऊली, हाजी गफार, सुनील कुलकर्णी, राजू तंगे, तुकाराम मिमरोत, प्रमोद वनारसे, निवृत्ती जुंबड आदी मान्यवर व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तरुण नेतृत्वामुळे हसनाबाद व्यापारी महासंघ अधिक गतिमान होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

**नवीन कार्यकारणी**

अध्यक्ष : भानुदास खरात

उपाध्यक्ष : राजीव इंगळे, अण्णा सुरूशे

सचिव : विश्वास शिंदे

कोषाध्यक्ष : सुरेश पवार

सहसचिव : लखन राठी

तर कार्यकारिणी सदस्य म्हणून योगेश वैष्णव, भिकण अहमद, शरद रामफळे, देवलाल आकोदे, शेख अजीज, अक्षय मोरे, सचिन रामफळे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.त्याचबरोबर महिला व्यापारी मंडळाचीही निवड करण्यात आली असून प्रभा रासने, उषा तंगे, कांता गरूड, छाया वैष्णव, वंदना खरात, मनीषा व्यवहारे यांची निवड करण्यात आली.

## राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेच्या वतीने महाप्रसादी वीरशैव संत कक्कया महाराज दिनदर्शिकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी ) :** राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेच्या वतीने महाप्रसादी वीरशैव संत कक्कया महाराज दिनदर्शिकाचे प्रकाशन दि.२०जाने. २०२६रोजी अखंड हरिनाम सप्ताह मंडपात करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर चांदबोधले,कार्याध्यक्ष श्री बाबासाहेब साबणे,महाराष्ट्र प्रदेश संघटक श्री परमेश्वर कावळे,समाजसेवक श्री सचिन बोधने,कोकण विभाग अध्यक्ष, श्री सुरेश मुनेमाणिक,श्रीगुरु



माउली प्रतिष्ठान उपाध्यक्ष श्री बबन कावळे, सल्लागार श्री सर्जेराव बोधने,श्री सटवाजी हवाले,ठाणे शहर अध्यक्ष श्री गणेश हौसारे,सल्लागार श्री नवनाथ चांदबोधले तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री बाळाजी नारायणकर,श्री.नितीन बोधने, श्री.मारोती खामकर,बहुजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष श्री गौतम भालेरावथ्,श्री कचरु बोराडे,श्री खंडु वाघमारे इत्यादी असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते .

# दर्जेदार व सुरक्षित आरोग्य सेवा देणे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## जिल्हा सामान्य रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची सखोल पाहणी

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम,जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि वेळेत आरोग्य सेवा मिळावी, हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. रुग्णालयांतील पायाभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा आणि सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या वेळी अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपकार्यकारी अभियंता अजीम शेख, आकाश कोळकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी, विद्युत उपअभियंता स्वरूप सरोदे आदी उपस्थित होते.

जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांची पाहणी करून रुग्ण व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने फायर ऑडिट करून घ्यावे, असे निर्देश दिले. तसेच क्रीटीकल केअर ब्लॉक आणि सेवरेज ट्रीटमेंट प्लॅन्टच्या सुरू असलेल्या बांधकामांची पाहणी करून ही कामे ठरलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावीत



आणि कामांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष ठेवावे, असे सांगितले.

यानंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध विभागांची पाहणी करण्यात आली. कुतूहल प्रदर्शनीच्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेताना जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे, असे निर्देश दिले. पोलीस, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, आरोग्य व शिक्षण विभागांनी सुरक्षेपासून स्वच्छतेपर्यंत प्रत्येक बाब काटेकोरपणे अंमलात आणावी, असे त्यांनी नमूद केले.

कुतूहल प्रदर्शनी यशस्वी होण्यासाठी वेळोवेळी साईट व्हिजिट करून कामांचा आढावा घ्यावा तसेच स्वतंत्र समित्या स्थापन करून जबाबदाऱ्या निश्चित कराव्यात, अशा सूचनाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिल्या.

शासकीय परिचर्या महाविद्यालयासाठी आवश्यक पदनिर्मिती तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तीगृह उभारणीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, जेणेकरून तो शासनस्तरावर प्रभावीपणे पाठपुरावा करता येईल, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

शासकीय परिचर्या महाविद्यालय पदनिर्मिती प्रस्ताव, वस्तीगृह बांधकामाचा प्रस्ताव सादर करावा जेणेकरून शासनस्तरावर पाठपुरावा करता येईल असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

या बैठकीत महाविद्यालयाच्या सध्याच्या गरजा, उपलब्ध मनुष्यबळ, विद्यार्थ्यांची संख्या, भविष्यातील विस्तार तसेच वस्तीगृह उभारणीमुळे होणारे शैक्षणिक व प्रशासकीय लाभ याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.सखोल माहितीचे सादरीकरण डॉ. कावरखे आणि डॉ. मेश्राम यांनी केले.

कुतुहल प्रदर्शनीच्या अनुषंगाने कुतुहल विज्ञान प्रदर्शन समितीचे सदस्य पत्रकार निलेश सोमाणी यांनी प्रदर्शनीचे नियोजन, मांडणी व अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा केली.

या चर्चेत प्रदर्शनी अधिक प्रभावी व आकर्षक कशी करता येईल, यासह विविध उपक्रमांचे नियोजन, समन्वय आणि जनसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुद्द्यांवर विचारविनिमय करण्यात आला.यावेळी आरोग्य यंत्रणेशी निगडित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## गोपाल गावंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**मानोरा तालुका प्रतिनिधी/नितीन अढाव :** तालुक्यातील रुई येथील रहिवासी श्री गोपाल गावंडे यांना वैदर्भियनाथ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने पुरस्कार वितरण करण्यात आला त्यांनी गेल्या काही वर्षापासून कृषी क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले तसेच त्यांचे हवामाना बद्दल विविध अंदाज अचूक ठरले तसेच त्यांचे कृषी क्षेत्रात मार्गदर्शन चांगल्या प्रकारे लोकांना मिळाले या मुळे अनेक शेतकरी वर्गाचे बदलत्या हवामानामुळे नुकसान पासून पिकाचे रक्षण करण्यास खूप मदत मिळाली त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महानायक वसंतरावजी नाईक कृषिभूषण तथा हवामान तज्ञ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले तसेच हा कार्यक्रम कारंजा येथील महेश भवन येथे आयोजित करण्यात आला होता तसेच सोहळ्याचे उद्घाटन कारंजा मानोरा विधानसभा आमदार मा. सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या हस्ते करण्यात आले तसेच पुरस्कार वितरण सोहळा त्यांचे उपस्थितीत पार पडला तसेच पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह मेडल,शाल, देऊन करण्यात आला तेथे उपस्थित मंडळी ज्योतिषाचार्य सागर महाराज देशमुख, संस्थेचे अध्यक्ष सौ. पुनमताई एकनाथ पवार, सचिव एकनाथ पवार,डॉ. पंकज काटोले व अनेक शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्तिथ होते.

---

## श्री.मुंगसाजी महाराज संस्थानात भक्तीचा महासागर!

### ६ जानेवारीला मुरलीधर महाराज धोंगडे यांचे जंगी जाहीर काल्याचे कीर्तन

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** पिंपळा (ता.मालेगाव, जि. वाशिम)श्री.मुंगसाजी महाराज संस्थान,पिंपळा येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. या पावन सोहळ्याच्या समारोपप्रसंगी ह.भ.प. मुरलीधर महाराज धोंगडे यांचे भव्य जाहीर काल्याचे कीर्तन दि. २६ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होणार आहे.

मुरलीधर महाराज धोंगडे हे वारकरी संप्रदायातील अभ्यासू, प्रभावी आणि प्रगल्भ कीर्तनकार म्हणून संपूर्ण विदर्भात सुप्रसिद्ध आहेत. वाशिम जिल्ह्यातच नव्हे तर अख्ख्या विदर्भात त्यांनी आपल्या सखोल अभ्यास, गोड वाणी आणि भक्तिरसपूर्ण सादरीकरणातून



वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कीर्तनातून भक्ती, नीती, संस्कार आणि समाजप्रबोधन यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो.

त्यांचा आवाज अत्यंत गोड, ओघवता आणि रसाळ असून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारा आहे. ग्रंथसंपदेचा सखोल अभ्यास, संतविचारांची प्रभावी मांडणी आणि आधुनिक पिढीला भावेल अशा शैलीत ते कीर्तन सादर करतात, ही त्यांची खास ओळख आहे.

मुंगसाजी महाराज संस्थानच्या पवित्र भूमीत होणाऱ्या या जाहीर काल्याच्या कीर्तनासाठी पिंपळा तसेच आजूबाजूच्या परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसाचा लाभ घ्यावा, अशी नम्र विनंती गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

---

## मल्हारवाडीत चिमुकल्यांनी मांडला 'अनुभवांचा बाजार'; 'आनंदनगरी'तून गिरवले व्यावसायिक शिक्षणाचे धडे!

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव मिळावा आणि त्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच व्यावहारिक जगाची ओळख व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मल्हारवाडी (केंद्र: पालोद) येथे मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी 'आनंदनगरी' हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अनोख्या खाद्यजत्रेत विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉल्सनी आणि त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपूर्ण मल्हारवाडी गाव आनंदात न्हाऊन निघाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन पालोद केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक डी. आर. सपकाळ यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना



डी.आर. सपकाळ म्हणाले की, "आनंदनगरीसारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत गरजेचे आहेत. यातून मुलांमध्ये हिशोब करण्याची वृत्ती, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागतो". तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भेळ, वडापाव अशा विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स सजवले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यावसायिक बनून ग्राहकांचे स्वागत केले आणि हिशोब सांभाळला. आलेल्या मान्यवरांनी व पालकांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन पदार्थांचा आस्वाद घेत चिमुकल्यांचे तोंडभरून कौतुक केले.

या सोहळ्यासाठी पालोद परिसरातील शिक्षण क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती लाभली. यात पालोदवाडीचे मुख्याध्यापक बागुल सर, चव्हाण सर, सारोळा शाळेचे मुख्याध्यापक बावस्कर सर, मल्हारवाडीचे माजी मुख्याध्यापक समिंद्रे सर, चिंचपूरचे मुख्याध्यापक जिरे सर, मोहंदरीचे मुख्याध्यापक ढेपले सर, जुनापाणीचे मुख्याध्यापक सोनवणे सर व बांबर्डे सर, तसेच लिहाखेडी शाळेचे भाले सर व भुतेकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामचंद्र सपकाळ, सर्व सदस्य आणि पालकांनी विशेष परिश्रम घेतले. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सरस्वती पालोदकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहशिक्षक संजय मोरे यांनी मानले. या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

---

## ई-केवायसी करूनही 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता न मिळाल्याने वाशिममध्ये महिलांचा संताप

**सावता परिषदेचे शहराध्यक्ष चेतन संतोषराव इंगोले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर महिलांची धडक; आठ दिवसांत हप्ता न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा**

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही नोव्हेंबर महिन्याचा हप्ता अद्याप मिळालेला नसल्याने वाशिम जिल्ह्यातील महिलांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सावता



परिषदेच्या वतीने आज वाशिम येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर संतप्त महिलांनी धडक देत आपल्या मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.

सदर आंदोलन सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष श्री. कल्याण काका आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष श्री. पांडुरंग रामचंद्र काठोळे, जिल्हाध्यक्ष (वाशिम) श्री. विलास विश्वनाथ ढगे, शहराध्यक्ष श्री. चेतन संतोषराव इंगोले, महिला जिल्हाध्यक्ष सौ. रंजना परिसकर, प्रदेशाध्यक्ष श्री. गणेश दळवी तसेच जिल्हा उपाध्यक्ष श्री. रवी वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सावता परिषदच्या वतीने जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालयाला निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, अनेक महिलांनी शासनाच्या सूचनेनुसार ई-केवायसी पूर्ण केली असतानाही नोव्हेंबर महिन्यापासून 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता त्यांच्या खात्यात जमा झालेला नाही. यामुळे संबंधित महिलांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.या योजनेचा प्रलंबित हप्ता सर्व पात्र महिलांच्या खात्यात येत्या आठ दिवसांच्या आत जमा करण्यात यावा, अन्यथा सावता परिषद वाशिम शहराच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे प्रशासनाला देण्यात आला आहे.

प्रशासनाने या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन संबंधित महिलांचा शासकीय योजनेचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी ठाम मागणी सावता परिषदने केली आहे.

---

## विद्यानगर परिसरातील पोलीस चौकी चालू करण्यात यावी अशी मागणी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी/महेश राऊत :** सेलू शहरातील विद्यानगर परिसरातील पोलीस चौकी चालू करण्यात यावी अशी मागणी विविध संघटना, राजकीय पक्ष, व स्थानिक प्रतिनिधींनी केली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव शाळेच्या पाठपुराव्यानंतर तत्कालीन पोलीस उप अधीक्षक श्रीमती रेणुका वागळे यांच्या हस्ते विद्यानगर पोलीस चौकीचे उद्घाटन करून ती सुरू करण्यात आली होती.मात्र सद्यस्थिती उद्घाटनाचा नाम फलक मोडून



टाकला असुन चौकी प्रत्यक्षात कार्यरत नसल्याचे निदर्शनात आले आहे. तरी ती चालू करण्यात यावी अशी मागणी सेलू पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी शिवसेना मा.तालुकाप्रमुख पवनराजे घुमरे,राहुल जाधव,सुशांत मोगल,रोहित चंडाले,कृष्णा वाघे,राजेश वायगुंडे,गुलाबराव खेडेकर,एकनाथ सोळंके,आदी शिवसेना युवासेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## सुरगाणा महाविद्यालयात मराठी भाषेतून स्व स्वाक्षरी कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठी भाषेतून स्व स्वाक्षरी अभिनव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मराठी ओळख ही केवळ लोक संवाद साधताना दिसतात परंतु त्याचा ठसा हा



स्व स्वाक्षरी करताना देखील उमटला पाहिजे. यात मराठीचे ताकद आणि सामर्थ्य दडलेले आहे.आज आपण मराठी भाषेला दुय्यम स्थान लेखून इंग्रजी विषयात जास्तीत जास्त स्वाक्षरी करताना दिसतात. केंद्र सरकारने ३ आक्टोंबर २०२४ रोजी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.त्यामुळे मराठी ही देशातील सातव्या क्रमांकावर आहे.त्यामुळे मराठी भाषेचा स्वाभिमान आणि अभिमान जागृत व्हावा यासाठी स्व स्वाक्षरी ही मराठीतून केली पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मराठीतून कागदावर स्व स्वाक्षरी करून कार्यक्रमाला उजाळा दिला.यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, डॉ. सी. आर. पाटील, डॉ.विनायक बागुल ,राजेंद्र शिंदे, डॉ.संतोष पवार, प्रा.बाळू धुम, प्रा.केशव गावित,प्रा.सुभाष कामडी, डॉ. सविता सिरसाठ,प्रा. संजय महाजन यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युनियन बँक महागाव शाखेतर्फे पीडित कुटुंबाला दोन लाखाचा धनादेश

**दैनिक युवक आधार**
**एम.डी.सुरोशे/महागांव :** तालुक्यातील पेढी येथील विमल रामदास ठाकरे वय अंदाजे 42 वर्षे यांचा हृदय विकाराने मृत्यू झाला मृत्यूपूर्वी त्यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती या योजनेअंतर्गत युनियन बँक शाखा महागाव येथे विमा काढला होता त्यांच्या दुःखद निधनानंतर महागाव शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सहानुभूतीपूर्वक व तत्परतेने त्यांच्या वारसांना शासकीय योजनेचा लाभ त्वरित मिळावा याकरिता तांत्रिक बाबींचा पाठपुरावा करून दोन लाखाची मदत मिळवून दिली.




युनियन बँकेचे शाखा व्यवस्थापक किरण सावळे पाटील, सहाय्यक शाखा व्यवस्थापक प्रमोद दुधाडे, ग्रामविकास अधिकारी सतीश कुबडे, दिलीप सिरतावार, वरिष्ठ लिपिक विनोद दुधे, संदीप वांगेकर, हनुमान इंगळे ,गणेश पुरी, ऋषिकेश वांगेकर, ग्राहक सेवा संचालक गोपाल कासार व दिलीप जाधव, यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या संदर्भात बँकेच्या कार्यक्षेत्रातील गावामध्ये जनजागृती केली त्यामुळे बचत गटातील महिला व शेतकऱ्यांनी हजारोच्या संख्येने जीवन ज्योती विमा काढला असून 436 रुपया मध्ये दोन लाखाचा विमा तसेच केवळ वीस रुपयांमध्ये प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने अंतर्गत दोन लाखाच्या अपघाती विमा प्रत्येक नागरिकांनी काढावा असे आवाहन बँक शाखेचे व्यवस्थापक किरण सावळे पाटील.

# उमरी नगर परिषद स्थायी व विषय समितीची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी नगर परिषद स्थायी समितीची निवडणुक पिठासिन अधिकारी मा.श्रीमती प्रियांका लालासो पवार, उपजिल्हाधिकारी भूसंपादन (लसिका), नांदेड यांच्या अध्यक्षतेत दि.21/01/2026 रोजी घेण्यात आली. त्यात पदसिध्द अध्यक्षा सौ.शकुंतला भगवान मुदीराज स्थायी समिती अध्यक्ष पदी तसेच पदसिध्द उपाध्यक्ष श्री कैलास श्रीनिवासराव देशमुख यांची पाणी पुरवठा व जलनिःस्सारण, वृक्ष प्राधिकरण समिती



सभापती पदी निवड झाली. तसेच बांधकाम व निविदा सभापती पदी श्री.संदीप दिलीप चंदनवार यांची तर महिला व बालकल्याण सभापती पदी श्रीमती निकाता कबीरराव सिंगनवाड तसेच नियोजन व विकास समिती सभापती पदी श्री विष्णुकूमार नंदकिशोर पंडीत यांची बिनविरोध निवड करण्यात आली .

सदर निवडणुक प्रक्रीये कामी नगरपरिषद मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर यांनी सहाय्यक अधिकारी म्हणुन कामकाज पाहिले सदर निवडणुक प्रक्रीया पार पाडण्यासाठी न.प.कार्यालयीन अधिक्षक कु.कांचन पडलवार, निवडणूक विभाग प्रमुख श्री सचिन गंगासागरे, गणेश मदने, लेखापाल श्री बालाजी चवरे, संगणक अभियंता श्री विनोद सावंत, अभियंता कैलास येमेलवाड, रचना सहायक कु.पुजा पावडे, लिपीक सुर्यकांत माळवतकर, लिपीक गंगाधर पवार, चंद्रकांत श्रीकांबळे, आकाश खंदारे, माधव जाधव, मुदीराज, एहतेशाम, सदानंद गायकवाड, ईत्यादी कर्मचारी यांनी कामकाज पाहीले आहे.

या निवडी प्रसंगी उपस्थित गटनेते राजेश शिवराम जाधव, सुनंदा झडते, रतन कंधारे, सलमाबेगम खुरेशी, अनुराधा खांडरे, साईनाथ जमदाडे, अनुसयाबाई कटकदवणे, गजानन आलसटवार, सायली कुलकर्णी, प्रिती रणनवरे, सुमनबाई रॅपनवाड, रुक्मीनबाई खांडरे, लक्ष्मीबाई शिंदे, मिराबाई शेळके, बाबुबेग हुसेनबेग इत्यादी नगरपरिषद सदस्य उपस्थित होते. सभापती निवडी नंतर माजी नगराध्यक्ष श्री.प्रविणभाऊ सारडा व इतर माजी नगरसेवक यांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती यांचा सत्कार करण्यात आला.

# राजकीय घडामोडींचा तरुणांच्या मानसिकतेवर खोलवर परिणाम प्रा. सुभाष पवार यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** देशातील सध्याची बदलती राजकीय स्थिती आणि वेगाने होणाऱ्या उलाढाली यांचा थेट परिणाम नवयुवकांच्या विचारांवर आणि त्यांच्या करिअरवर होत आहे. तरुणांनी केवळ राजकारणाचे प्रेक्षक न बनता, एक सजग नागरिक म्हणून या प्रवाहाकडे सकारात्मकतेने पाहावे, असे आवाहन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुभाष पवार यांनी केले.




डांग सेवा मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने आयोजित 'विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात आयोजित 'सध्याच्या राजकीय उलाढालीचा नवयुवकांवर होणारा परिणाम' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. पवार म्हणाले की, राजकारण ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित प्रक्रिया नसून, ती देशाच्या धोरणनिर्मितीचा पाया आहे. त्यामुळे तरुणांनी यात सुशिक्षित सहभाग नोंदवणे ही काळाची गरज आहे. सध्या राजकीय प्रचारासाठी सोशल मीडियाचा वणवा पसरला आहे. यामुळे तरुणांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे. कोणतीही माहिती स्वीकारण्यापूर्वी त्याची सत्यता पडताळणे (Fact Check) आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. राजकारणातील अस्थिरता थेट देशाच्या आर्थिक आणि शैक्षणिक धोरणांवर परिणाम करते, ज्याचा फटका अंतिमतः तरुणांच्या रोजगाराला बसतो, असे विश्लेषणही त्यांनी मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक योगेश गायकवाड याने केले व उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. मंदीप राऊत, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. हेमलता महाले, सहाय्यक अधिकारी प्रा. सारिका पागी, प्रा. तुळशीराम चौधरी, प्रा. राजाराम कणसे, अनिल ठाकरे यांच्यासह स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

# विंचूर-थेटाळे रस्त्यावरून सिलेरिओ कार चोरीस

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** विंचूर–थेटाळे रस्त्यावरील जंगल परिसरात रात्री बंद पडलेली मारुती सुझुकी सिलेरिओ कार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत ऋषिकेश शांताराम शिरसागर (रा. शिवडी, ता. निफाड) यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, दि. १८ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता ते आपली मारुती सुझुकी सिलेरिओ कार (क्र. एम.एच. ०५ डी.एच. ६०५६) घेऊन विंचूर येथे मामांस भेटण्यासाठी गेले होते. रात्री सुमारे ९ वाजता विंचूर–थेटाळे मार्गे शिवडीकडे परत येत असताना जंगल परिसरात अचानक कार बंद पडली.कार सुरू न झाल्याने रस्त्याने जाणाऱ्या मोटारसायकलस्वाराच्या मदतीने त्यांनी कार रस्त्याच्या कडेला उभी केली. परिसरात कोणतेही दुरुस्ती दुकान नसल्याने वडिलांच्या सूचनेनुसार कार तेथेच उभी ठेवून ते घरी परतले.

दुसऱ्या दिवशी दि. १९ जानेवारी रोजी सकाळी साडेसात वाजता मॅकेनिकसह कार उभी केलेल्या ठिकाणी गेले असता कार तेथे आढळून आली नाही. त्यानंतर आजूबाजूचा परिसर तसेच विंचूर, लासलगाव, निफाड, नैताळे, शिवडी, येवला, चांदवड व नाशिक भागात शोध घेऊनही कार सापडली नाही.

चोरीस गेलेल्या कारची किंमत सुमारे ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले असून, या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळासाहेब कांदळकर पुढील तपास करीत आहेत.

# जिल्हास्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत क्रीडा सह्याद्री निफाड संघाला सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक व टेनिस क्रिकेट असोसिएशन दिंडोरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय मिनी ज्युनियर ग्रामीण टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी दिंडोरी येथील पोलीस भरती प्रशिक्षण ग्राउंड, टेलिफोन कॉलनी, उमराळा रोड येथे उत्साहात संपन्न झाली.

या स्पर्धेत क्रीडा सह्याद्री निफाड संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. अंतिम सामन्यात क्रीडा सह्याद्री निफाड संघाने बालभारती इंग्लिश मीडियम स्कूल, दिंडोरी संघाचा पराभव करत विजेतेपद पटकावले. बालभारती स्कूलला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर संताजी इंग्लिश मीडियम स्कूल, वणी संघाने तृतीय क्रमांक मिळवला.

**मुलींच्या गटात**

प्रथम क्रमांक : बालभारती पब्लिक स्कूल, दिंडोरी

द्वितीय क्रमांक : गोल्डन डेज युनिव्हर्सल स्कूल, दिंडोरी

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव मीनाक्षी गिरी, उपाध्यक्ष विलास गिरी, महिला उपाध्यक्ष धनश्री गिरी, तसेच नाशिक जिल्हा टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड



यांच्यासह प्रशांत आढाव, अनिकेत भवर, मुकेश सोनवणे, संदीप बोरसे, सहसचिव धनंजय लोंखडे, राष्ट्रीय खेळाडू सनी बलसाने व अनेक क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

या निवड चाचणीसाठी नाशिक जिल्ह्यातील निफाड, दिंडोरी, सटाणा, देवळा, इगतपुरी, पेठ, सुरगाणा आदी तालुक्यांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला. उद्घाटनप्रसंगी विलास गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना टेनिस क्रिकेट खेळाची माहिती व नियम समजावून सांगितले.

यावेळी बोलताना विलास गायकवाड यांनी सांगितले की, राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा नाशिक येथे होणार असून त्यात नाशिक ग्रामीण संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंच्या माध्यमातून नाशिक ग्रामीण संघ राज्यस्तरावर दमदार कामगिरी करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्पर्धेतील सर्व विजयी व सहभागी संघांचे आयोजक व मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# विद्यार्थ्यांना करिअरच्या नव्या संधींकडे नेणारी कौशल्य विकास कार्यशाळा नाईक-अंतुले महाविद्यालयात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा तालुका प्रतिनिधी/ शिरीष समेळ :** आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या आणि तीव्र स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसाठी केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, पदव्युत्तर शिक्षण, नवनवीन कौशल्यांचे आत्मसातकरण आणि सतत अद्ययावत ज्ञान हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उदात्त उद्देशाने म्हसळा येथील नाईक–अंतुले महाविद्यालयात रोजगार क्षमता व कौशल्य विकास मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



कोकण उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली, महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा पार पडली. प्रभारी प्राचार्य प्रा. दिगंबर टेकळे यांच्या अध्यक्षतेखाली, पुणे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आंत्रप्रेन्योरशिपच्या सहकार्याने पदवीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया व कौशल्य विकास यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून २८ वर्षांचा प्रदीर्घ शैक्षणिक व कॉर्पोरेट अनुभव लाभलेले मार्केटिंग मॅनेजमेंटचे असोसिएट प्रोफेसर डॉ. वसीमराजा सैयद तसेच एच.आर. मॅनेजमेंटचे असोसिएट प्रोफेसर डॉ. तल्हा अहमद उपस्थित होते.

डॉ. वसीमराजा सैयद यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना भविष्याच्या संधी कशा ओळखाव्यात व आव्हानांना आत्मविश्वासाने कसे सामोरे जावे, याबाबत अत्यंत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी ज्ञान सतत अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी योग्य व्यक्तींच्या सहवासाचे मोल, वाचनाची सवय, तसेच प्राप्त कौशल्यांमध्ये सातत्याने प्रावीण्य मिळवण्याची गरज विविध उदाहरणांतून स्पष्ट केली. "या पाच गोष्टींचा मनापासून स्वीकार केल्यास, संघर्षमय जगात अपेक्षित रोजगार संधी आणि समाधानकारक उत्पन्न नक्कीच मिळवता येईल," असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला.

डॉ. तल्हा अहमद यांनी आपल्या भाषणात महिला सक्षमीकरणावर विशेष भर दिला. आर्थिक अडचणींमुळे कोणाच्याही शिक्षणाचा प्रवास थांबू नये, यासाठी विविध शिष्यवृत्ती योजनांच्या माध्यमातून उच्च शिक्षण कसे पूर्ण करता येते, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. नाईक–अंतुले महाविद्यालयातील मुली शिक्षणाकडे अत्यंत प्रामाणिकपणे व चिकाटीने वाटचाल करत असल्याचे पाहून त्यांनी विशेष आनंद व समाधान व्यक्त केले. ही संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्याबद्दल बॅरिस्टर ए. आर. अंतुले तसेच संस्थेचे चेअरमन मुश्ताक अंतुले यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. एम. एच. सिद्दीकी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आर. जी. हालोर यांनी सादर केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. एम. आर. बढे यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल, ऑन जॉब ट्रेनिंग व विद्यार्थी कौशल्य विकास समिती तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाने विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास प्रा. राजेंद्र हलोर, प्रा. तुषार उमासरे, प्रा. शिरीष समेळ, प्रा. अतिका नजिरी, प्रा. सलमा नजिरी, प्रा. सालिहा मुक्कादम, डॉ. संजय बेद्रे, प्रा. कानिफ भोसले, प्रा. बंदरकर यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच तृतीय वर्ष बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी. वर्गातील बहुसंख्य विद्यार्थी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

# भारताच्या सागरी प्रगतीचा डंका; जागतिक स्तरावर २६ देशांच्या आंतरराष्ट्रीय पत्रकाराने अनुभवली जेएनपीए ची हायटेक यंत्रणा!"

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** भारताची सागरी व्यापारातील वाढती ताकद मंत्रालयामार्फत आयोजित एका विशेष मोहिमेत २६ देशातील २७ आंतरराष्ट्रीय पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मंगळवार दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाला भेट दिली.




या भेटीदरम्यान पत्रकारांनी भेट देऊन प्रत्यक्ष लाईव्ह जेएनपीए च्या टर्मिनल ला कार्गो हाण्डेलिंग ऑपरेशन्स पाहिले बंदराची प्रगती यंत्रणा डिजिटलायझेशन आणि स्वयंचलित प्रणाली पाहून आंतरराष्ट्रीय पत्रकार भारावून गेले. यावेळी पत्रकारांना आगामी महत्वकांशी वाढवण बंदर प्रकल्पाबद्दलची ही माहिती देण्यात आली हे बंदर जगातील पहिल्या १० कंटेनर बंदरांच्या यादीत स्थान मिळवेल ,असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला. या भेटीमुळे आम्हाला भारताची प्रगत सागरी क्षमता जगासमोर मांडण्याची संधी मिळाली असे मत जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष गौरव दयाल (भारतीय प्रशासक सेवा)यांनी मांडले. शिष्टमंडळाने 'इज ऑफ डूइंग बिजनेस, 'आणि भारताच्या वाढत्या सागरी पावलांबद्दल अधिकाऱ्यांची सविस्तर चर्चा केली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# लठ्ठपणासारख्या आजारावर मात करण्यासाठी नवी मुंबईत मेडिकव्हरचे ‘ओबेसिटी क्लिनिक’

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** भारतात सर्वच वयोगटांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना, मेडिकव्हर हॉस्पिटलने नवी मुंबईत विशेष ‘ओबेसिटी क्लिनिक’ची सुरुवात केली आहे. जास्त वजन, प्रीडायबेटीस, टाइप २ मधुमेह, बैठी जीवनशैली, ताणतणाव तसेच उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि हार्मोनल असंतुलन यांसारख्या आरोग्य समस्यांनी त्रस्त रुग्णांना या क्लिनिकच्या माध्यमातून सर्वसमावेशक उपचार व मार्गदर्शनाचा लाभ घेता येणार आहे . या उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कीर्ती समुद्र(वरिष्ठ सल्लागार, एम.डी. (वैद्यकशास्त्र) व मधुमेह तज्ज्ञ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

वाढता लठ्ठपणा आणि त्यातून उद्भवणारे विविध आजार वेळीच नियंत्रणात आणणे, हा या क्लिनिकचा मुख्य उद्देश आहे. बदलत्या जीवनशैली बरोबरच कामाचे वाढते तास, शारीरिक हालचालींचा अभाव, जेवणाच्या अनियमित वेळा, अपुरी झोप आणि दीर्घकालीन ताण हे घटकही दैनंदिन जीवनात सामान्यपणे आढळून येऊ लागले आहेत. हे घटक केवळ वजन वाढण्यास कारणीभूत ठरत नाहीत, तर रक्तातील साखरेचे नियंत्रण बिघडवतात, ज्यामुळे कालांतराने मधुमेहासारख्या आजाराचा सामना करावा लागू शकतो. योग्य मार्गदर्शनाअभावी बऱ्याच व्यक्ती अनेक वर्षे लठ्ठपणा आणि मधुमेहाशी लढा देत असतात. क्रॅश डाएट किंवा चुकीच्या औषधोपचारांवर अवलंबून राहतात, ज्यामुळे भविष्यात गंभीर गुंतागुंतीचा सामना करावा लागू शकतो. ओबेसिटी क्लिनिक हे वजन वाढणे आणि रक्तातील साखरेची उच्च पातळीसारख्या मूळ कारणांचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रित करते. त्यानुसार आहार, शारीरिक हालचालींसंबंधी मार्गदर्शन, समुपदेशन आणि निदान केले जाते. प्रत्येक उपचार योजना ही त्या व्यक्तीचे वय, वैद्यकीय इतिहास, जीवनशैली आणि




चयापचय आरोग्य यानुसार तयार केली जाते. लठ्ठपणा, मधुमेह नियंत्रण आणि एकूण चयापचय आरोग्यावर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन तसेच जीवनशैलीशी संबंधित दीर्घकालीन गुंतागुंत कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय पुरविण्याकरिता तज्ज्ञांचे मार्गदर्शन , एंडोक्राइनोलॉजिस्ट, आहारतज्ज्ञ, फिटनेस तज्ज्ञ आणि मानसोपचारतज्ज्ञ याठिकाणी कार्यरत आहेत. डॉ. प्रशांत गायकवाड(मेडिकव्हर हॉस्पिटलचे एंडोक्राइनोलॉजिस्ट) म्हणाले, लठ्ठपणा आणि टाइप २ मधुमेह यांचा परस्पर संबंध असून ते वर्षानुवर्षे हळूहळू विकसित होत जातात. या केवळ जीवनशैलीच्या समस्या नाहीत तर याचा परिणाम हृदय, मूत्रपिंड, मज्जासंस्था आणि एकूणच जीवनाच्या गुणवत्तेवर होतो. अनेक प्रौढ व्यक्ती मूळ समस्या समजून न घेता विविध प्रकारचे डाएट फॉलो करुन किंवा केवळ औषधांवर अवलंबून राहतात. या क्लिनिकद्वारे आम्ही जीवनशैलीतील योग्य बदलांवर भर देत आहोत जे वजन नियंत्रित करण्यास, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राखण्यासाठी आणि गंभीर गुंतागुंतचा धोका कमी करण्यास मदत करतात. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या आहारशास्त्र विभागाच्या प्रमुख राजेश्वरी पांडा सांगतात की, मधुमेह नियंत्रित करणे म्हणजे केवळ आहाराचे काटेकोरपणे पालन करणे नव्हे, तर आहारातील पोषण, ताणतणाव, झोप आणि दैनंदिन सवयींना शरीर कसा प्रतिसाद देते हे समजून घेणे गरजेचे आहे.

या क्लिनिकमध्ये, आम्ही व्यावहारिक आणि संतुलित आहाराच्या योजना तयार करतो, ज्या प्रौढांच्या वास्तविक जीवनशैलीत सहजपणे समाविष्ट करता येतील. पोषणाची गुणवत्ता, जेवणाची वेळ आणि नियमितता सुधारून, आम्ही रुग्णांना चयापचय सुधारण्यास, रक्तातील साखरेची पातळी व्यवस्थापित करण्यास, ऊर्जेची पातळी वाढवण्यास आणि कालांतराने अधिक निरोगी आयुष्य जगण्यास मदत करतात. केवळ वजन कमी करणे हे आमचे ध्येय नसून, दीर्घकालीन चयापचय आरोग्य कसे सुधारता येईल याकरिता आम्ही प्रयत्न करतो. नवी मुंबईच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्रप्रमुख संदीप जोशी म्हणाले, हृदयविकार, सांध्यांच्या समस्या किंवा मूत्रपिंडाच्या समस्यांसारखी गुंतागुंत निर्माण होईपर्यंत लठ्ठपणा आणि मधुमेहाकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. वेळीच वैद्यकीय उरचार आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास दीर्घकालीन आरोग्याचा धोका कमी होऊ शकतो. या ओबेसिटी क्लिनिकच्या माध्यमातूम मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. वेळीच आपल्या आरोग्याबाबत जागरुक होऊन उपचार घेण्यासाठी रुग्णांना याठिकाणी प्रोत्साहन दिले जाते.

---

## येवदा बस थांब्यावरील छोटी दुकाने हटवण्यास स्थगिती द्या

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे/तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर :** दर्यापूर येवदा येथील राज्य मार्गा लागत मागील अनेक वर्षापासून व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने दुकाने हटवण्याच्या नोटीस बजावल्या. यामुळे अनेक गरीब गरीब कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज येवदा व्यापारी संघाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देऊन आमचा रोजगार वाचवा, असे साकडे घालण्यात आले आहे. येवदा बस स्थानक व महामार्ग परिसरात अनेक पिढ्यापासून ग्रामस्थ छोटे-मोठे व्यवसाय करत आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ५, दर्यापूर यांनी दि.९



जानेवारी २०२६ रोजी नोटीस जारी करून

दि.१८. जानेवारीपर्यंत जागा खाली करण्याचे निर्देश दिले आहेत. येथील बहुशांत दुकानदार हे अत्यंत सामान्य गरीब घरातील आहेत. हे व्यवसाय बंद झाल्यास यांच्या मुला बाळाच्या शिक्षणाचा आणि कुटुंबाच्या चरितर्थाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे प्रशासनाने केवळ कायदेशीर बाजू न पाहता. मानवी दृष्टिकोनातून विचार करून आम्हाला संरक्षण द्यावे. यावेळी श्री. नितीन बडे. सचिन बोदडे. सत्ययोग हिरुळकर. राम रघुवंशी. यांच्यासह संघाचे इतर सदस्य आणि स्थानिक विक्रेते उपस्थित होते.

आम्ही प्रशासनाच्या विरोधात नसून. आमची केवळ एवढीच विनंती आहे की, अनेक वर्षापासून सुरू असलेला आमचा रोजगार हिरावून घेऊ नका. प्रशासनाने आमच्या गरीब कुटुंबाचा विचार करावा आणि न्याय द्यावा. श्री नितीन बढे अध्यक्ष येवदा व्यापारी संघ "दुकान उचलण्याच्या आलेल्या नोटीसामुळे व्यापारी बांधव दास्तावले आहेत.

अनेकांचे संसार यावरच चालतात. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा विचार करून त्यांची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कारवाई टाळण्यात यावी. श्री. सचिन बोदडे. सचिव येवदा. व्यापारी संघ

---

## श्री अष्टविनायक मित्रमंडळातर्फे आदई येथे माघी गणेशोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आदई येथे अष्टविनायक मित्र मंडळातर्फे माघी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सन 2009 मध्ये या उत्सवास सुरुवात करण्यात आली होती. तेव्हापासून दरवर्षी अतिशय भक्तिपूर्ण वातावरणात हा उत्सव साजरा केला जात आहे. यंदाचे या उत्सवाचे 18 वे वर्ष असून या वर्षीही या उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते गेल्या महिन्यापासून माघी गणेशोत्सवाची तयारी करत आहेत. त्यामुळे अतिशय नियोजनबध्द पध्दतीने भक्तीपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम होणार आहे.

गणेशाचा आगमन सोहळा होणार असून सकाळी 8 वाजता श्री गणेश मूर्ती अभिषेक व पूजन होणार आहे. तर दुपारी



12 वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर सायं. 4 ते 6 या वेळेत रखुमाई महिला मंडळ हरिपाठ आदई हरिपाठ सादर करणार आहेत. सायं. 4 ते 7 श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ आदईतर्फे सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम होणार आहे. तर उपस्थित गणेशभक्तांच्या मनोरंजनाकरिता रात्री 8 वाजता ‘हसू या खेळूया पैठणी जिंकू या’ हा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. तरी गणेशभक्तांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री अष्टविनायक मित्र मंडळ आदई तर्फे करण्यात आले आहे.

---

## अकोटात भाजपचे दोन तर शिवसेना, राष्ट्रवादी, प्रहार चा प्रत्येकी एक सभापती अविरोध!!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट प्रतिनिधी :** मागील महिन्यात नगरपरिषदेची निवडणूक पार पडल्यानंतर मंगळवार दि. २० जानेवारी रोजी सर्वसाधारण सभा घेण्यात आली.

त्यात नगरपरिषदेच्या विविध विषय समिती सभापती, तसेच स्थायी समिती सदस्यांची निवड करण्यात आली . निवड प्रक्रियेत काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम यांनी तटस्थ भूमिका घेतली.

सभापती पदासाठी झालेल्या निवडीमध्ये बांधकाम समिती सभापतीपदी सुशील पुंडकर (प्रहार जनशक्ती पक्ष), आरोग्य समिती सभापतिपदी मनीष कराळे (भाजप), पाणीपुरवठा समिती सभापतिपदी अमोल पालेकर (भाजप), महिला व बालकल्याण समिती सभापतिपदी नयना इंगोले (शिवसेना शिंदे गट) आणि शिक्षण समिती सभापतिपदी सलमा बेगम मो. खालिद (राष्ट्रवादी अजित पवार) यांची निवड झाली. तसेच महिला




व बालकल्याण उपसभापतिपदी शुभांगी टेमझरे (भाजप) तर स्थायी समिती सदस्यपदी सीताबाई मर्दाने (भाजप), निकिता जुनगरे (राष्ट्रवादी शरद पवार) व शेख ख्वाजा अ. रशीद (काँग्रेस) यांची निवड झाली.

---

## सिल्लोडमध्ये 'इरा'च्या शिलेदारांचा रणसंग्राम; 'खेळ-खेलमे.. उडान' महोत्सवात पालकांनीही गाजवलं मैदान!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** मैदानावर उडालेला धुरळा, चिमुकल्या खेळाडूंचा ओसंडून वाहणारा उत्साह आणि आपल्या पाल्याचा वेग पाहून पालकांनी दिलेली दाद... अशा अत्यंत चैतन्यमय वातावरणात सिल्लोड येथील नामांकित इरा नेक्सस सीबीएसई स्कूल आणि नेक्सस सेमी स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव 'खेळ-खेलमे.. उडान' नुकताच मोठ्या दिमाखात पार पडला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी केवळ पदकेच जिंकली नाहीत, तर आपल्या शिस्तबद्ध सादरीकरणाने उपस्थित सिल्लोडकरांची मनेही जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रवीण शिंदे (संचालक, के.आर.एस. अकॅडमी, छत्रपती संभाजीनगर), डॉ. मधुकर दांडगे (राष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षक) आणि माने सर (प्रसिद्ध कबड्डी प्रशिक्षक) यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी शाळेचे संचालक सिद्धेश्वर आहेर, गजानन गव्हाणे आणि अश्विनी आहेर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

महोत्सवाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सादर केलेले मार्च पास्ट (संचलन) आकर्षणाचे केंद्र ठरले. त्यानंतर धावणे, लांब उडी यांसारख्या मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी विजेच्या वेगाने धावत आपली चपळता सिद्ध केली. खो-खो, कबड्डी यांसारख्या सांघिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखवलेली रणनीती आणि जिद्द एखाद्या व्यावसायिक खेळाडूला साजेशी होती.

या क्रीडा महोत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे केवळ विद्यार्थीच नव्हे, तर त्यांच्या पालकांसाठीही विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या




मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी अनेक पालकांनी ट्रॅकवर धावत स्पर्धेत भाग घेतला. मुलांनीही टाळ्यांच्या कडकडाटात आपल्या पालकांचे मनोबल वाढवले, ज्यामुळे मैदानावर एक कौटुंबिक आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

"विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाचे स्थान अढळ आहे. मैदानावर मिळणारा विजय आत्मविश्वास देतो, तर पराभव जिद्द शिकवतो. 'इरा' समूहाने आयोजित केलेला हा उपक्रम भविष्यातील राष्ट्रीय खेळाडू घडवण्यासाठी मैलाचा दगड ठरेल," असे गौरवद्गार मान्यवरांनी आपल्या भाषणात काढले.हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी इरा ग्रुपच्या सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले . कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विजेत्या खेळाडूंचा आणि पालकांचा सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला.

---

## केईएस श्री जयंतीलाल एच. पटेल लॉ कॉलेजमध्ये लेक्स नोव्हा – आयपीआर संशोधन केंद्राचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** केईएस श्री जयंतीलाल एच. पटेल लॉ कॉलेजने बौद्धिक संपदा हक्क (IPR) क्षेत्रातील कायदेशीर जागरूकता वाढवणे आणि शैक्षणिक संशोधनाला चालना देणे या उद्देशाने लेक्स नोव्हा – बौद्धिक संपदा संशोधन केंद्राचे यशस्वीपणे उद्घाटन केले.

उपस्थितांना संबोधित करताना, प्रभारी प्राचार्या डॉ. व्हायरल दवे यांनी सांगितले की, लेक्स नोव्हाची स्थापना हे कायद्याच्या उदयोन्मुख आणि विशेष क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याप्रती संस्थेच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. त्यांनी यावर जोर दिला की, हे केंद्र कायदेशीर शिक्षण, नावीन्य आणि उद्योगाच्या गरजा यांच्यातील दरी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवते.



उद्घाटन समारंभाला बौद्धिक संपदा क्षेत्रातील प्रतिष्ठित तज्ज्ञांनी उपस्थिती लावून शोभा वाढवली. भारत सरकारच्या मुंबई येथील पेटंट कार्यालयाचे पेटंट आणि डिझाइन्सचे सहाय्यक नियंत्रक श्री. सागर पोल यांनी नावीन्यपूर्णतेला चालना देण्यासाठी, संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासात योगदान देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. लेक्स मॅन्टिसच्या संस्थापिका श्रीमती अनुराधा माहेश्वरी यांनी स्पर्धात्मक जागतिक वातावरणात उद्योग, स्टार्टअप्स आणि कायदेशीर व्यावसायिकांसाठी बौद्धिक संपदेच्या धोरणात्मक महत्त्वावर भर दिला.

सॉलोमन अँड कंपनी, ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स येथील भागीदार श्रीमती जर्मेन परेरा यांनी कायदा, विज्ञान आणि नावीन्य यांच्यातील परस्परसंबंधावर आपले विचार मांडले. खैतान अँड कंपनीचे भागीदार श्री. अधिश नारगोलकर यांनी पेटंट कायदा आणि बौद्धिक संपदा व्यवस्थापनाच्या व्यावहारिक पैलूंवर सविस्तर माहिती दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आयपीआर तज्ञ ॲड. सुब्रमण्यम वुथा यांनी तंत्रज्ञान-आधारित युगात बौद्धिक संपदेच्या विकसित होत असलेल्या भूमिकेबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी सामायिक केली.

हे केंद्र प्रभारी प्राचार्या डॉ. व्हायरल दवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आले आहे. लेक्स नोव्हाचे संयोजन कायदा विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका आणि विभागप्रमुख सुश्री पूजा मनियार, तसेच सहाय्यक प्राध्यापिका सुश्री तान्या शर्मा, श्री. महावीर मांडोत आणि सुश्री ज्योती बामणे यांनी केले आहे.

आयोजकांनी लेक्स नोव्हा – आयपीआर संशोधन केंद्राचे उद्घाटन यशस्वी करण्यासाठी दिलेल्या सततच्या पाठिंब्याबद्दल, मार्गदर्शनाबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल प्रभारी प्राचार्या डॉ. व्हायरल दवे आणि कांदिवली एज्युकेशन सोसायटी (KES) च्या व्यवस्थापनाचे मनःपूर्वक आभार मानले.

---

## आयशर कंपनीचा सहा चाकी वाहन झाले पलटी



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल शहरातील नाट्यगृहासमोरील प्रशासकीय भवनाचे काम सुरू आहे. या ठिकाणी दगडाने भरलेला सहा चाकी आयशर कंपनीचा हायवा 21 जानेवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारास पलटी झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.एमएच ४६ एफ ३०२३ या कंपनीचे सहा चाकी वाहन प्रशासकीय भवनाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी दगड टाकण्यासाठी आला होता. यावेळी काम चालू असलेल्या ठिकाणी वाहनाचे चाक मातीत रुतले आणि हे वाहन पलटी झाले. यात वाहनाचे नुकसान झाले असून दगड खाली कोसळले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. या वाहनाला बाहेर काढण्यासाठी क्रेनचा आधार घेण्यात आला.

# रिसायकलकॅरोने महाराष्ट्रात 'रेअर अर्थ्स अँड ॲडव्हान्स्ड मटेरियल्स' संशोधन केंद्राचे केले उद्घाटन

**■ ई-कचरा आणि एंड-ऑफ-लाईफ बॅटऱ्यांमधून अर्बन मायनिंग आणि क्रिटिकल मटेरियल रिकव्हरी पुढे नेण्यासाठी पालघरच्या वाडा येथे नवीन संशोधन केंद्राची स्थापना**

**■ भारताच्या खनिज सुरक्षेच्या प्राधान्यांशी सुसंगत पुनर्प्राप्ती मार्ग आणि प्रक्रिया कार्यक्षमतेत सुधारणा करण्याचा उद्देश**

**■ आरअँडडी-आधारित प्रक्रिया सुधारणा यांच्या मदतीने रेअर अर्थ प्रोसेसिंग क्षमता 20,000 मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्याचे कंपनीचे लक्ष्य**




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

**मुंबई :** ई-कचरा आणि लिथियम-आयन बॅटरी रिसायकलिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी रिसायकलकॅरोने (RECYCLEKARO) आज मुंबईजवळील पालघर जिल्ह्यातील वाडा येथे 'रेअर अर्थ्स अँड ॲडव्हान्स्ड मटेरियल्स रिसर्च सेंटर'चे उद्घाटन केले. हे संशोधन केंद्र कंपनीच्या अर्बन मायनिंग आणि ॲडव्हान्स्ड मटेरियल्स क्षमतांना बळ देणारे एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक पाऊल ठरणार आहे. या केंद्रामार्फत वापराअखेरच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणे, लिथियम-आयन बॅटऱ्या आणि अन्य गुंतागुंतीच्या ई-कचरा प्रवाहांमधून महत्त्वपूर्ण व रेअर अर्थ धातूंचे कार्यक्षम निष्कर्षण (एक्स्ट्रॅक्शन) अधिक प्रभावीपणे करण्यावर भर देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे रेअर अर्थ्स आणि ॲडव्हान्स्ड मटेरियल्सच्या निष्कर्षण क्षमतांमध्ये जलद आणि शाश्वत पद्धतीने वाढ करण्यास कंपनीला मदत होणार आहे.

पाच एकरांवर पसरलेले रिसायकलकॅरोचे वाडा येथील आरअँडडी केंद्र हे संशोधन-आधारित, दीर्घकालीन व्यासपीठ म्हणून संकल्पित करण्यात आले असून, पुढील पाच वर्षांत त्याचा विकास होणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून साहित्याविषयी सखोल समज आणि प्रक्रिया कार्यक्षमतेत सुधारणा साधली जाणार असून, त्यामुळे संघटित रिसायकलिंग परिसंस्थेला भारताच्या रणनीतिक साहित्य रोडमॅपमध्ये अधिक अर्थपूर्ण भूमिका बजावता येणार आहे. संशोधनाचा अजेंडा रेअर अर्थ रिकव्हरी, प्रगत विभाजन व शुद्धीकरण, बॅटरी साहित्याचे ऑप्टिमायझेशन, तसेच उच्च उत्पादन व शुद्धतेसाठी स्केलेबल प्रक्रिया विकास या प्राधान्य क्षेत्रांवर केंद्रित असेल. या केंद्रातून मिळणाऱ्या निष्कर्षांचा समावेश कंपनीच्या रेअर अर्थ रिकव्हरी उपक्रमांमध्ये करण्यात येणार असून, रिसायकलकॅरो फक्त रेअर अर्थ्ससाठी 20,000 मेट्रिक टन (MT) प्रक्रिया क्षमता वाढवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

सध्या रिसायकलकॅरोकडे 24,500 MT ई-कचरा आणि 10,000 MT लिथियम-आयन बॅटरी कचरा प्रक्रिया करण्याची क्षमता असून, मोठ्या प्रमाणावर जबाबदार संसाधन पुनर्प्राप्तीसाठी भक्कम कार्यक्षम पाया उभारण्यात आला आहे. वाडा येथील हे संशोधन केंद्र या पुढील टप्प्याला गती देण्यासाठी असून, देशाची खनिज सुरक्षा बळकट करण्यासाठी स्वदेशी वैज्ञानिक आणि प्रक्रिया क्षमता विकसित करण्याचा त्याचा उद्देश आहे.

सातत्यपूर्ण क्षमता निर्माण करण्यासाठी रिसायकलकॅरो 2030 पर्यंत टप्प्याटप्प्याने सुमारे ₹500 कोटींची गुंतवणूक करणार असून, जागतिक दर्जाची संशोधन पायाभूत सुविधा उभारणे आणि पुढील 12 ते 24 महिन्यांत संरचित पद्धतीने प्रतिभा विकास करण्याचा कंपनीचा मानस आहे. याअंतर्गत संशोधन शास्त्रज्ञ, पीएचडी व डॉक्टरेट संशोधक, तसेच मटेरियल सायन्स, मेटलर्जी आणि केमिकल इंजिनिअरिंग यांसारख्या विविध शाखांतील विशेष भूमिका असलेल्या तज्ज्ञांची नियुक्ती केली जाणार आहे. या केंद्राचा रोडमॅप टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणाऱ्या संशोधन कार्यक्रमांच्या माध्यमातून निश्चित केला जाणार असून, त्याद्वारे पुनर्प्राप्ती मार्ग अधिक बळकट करणे आणि कालांतराने प्रक्रिया कार्यक्षमतेत सातत्याने सुधारणा करणे हा उद्देश आहे.

एव्हरग्रीन रिसायकलकॅरोचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक राजेश गुप्ता म्हणाले, "भारताची खनिज सुरक्षा केवळ आयात किंवा खाणकामावर अवलंबून न राहता, आपण काय पुनर्प्राप्त करू शकतो यावरही आधारित असली पाहिजे. हे केंद्र साहित्याविषयीची समज, पुनर्प्राप्ती मार्ग आणि प्रक्रिया कार्यक्षमतेत सुधारणा करून अर्बन मायनिंगच्या विज्ञानाला पुढे नेईल, ज्यामुळे वापराअखेरची उत्पादने परिपत्र अर्थव्यवस्था आणि स्वयंपूर्ण भारतासाठी अधिक विश्वासार्ह संसाधन ठरू शकतील."

आपल्या संशोधन धोरणाचा भाग म्हणून रिसायकलकॅरो आयआयटी बॉम्बे, आयआयटी कानपूर, आयआयटी हैदराबाद यांसह देशातील इतर अग्रगण्य शैक्षणिक संस्थांबरोबर उद्योग–शैक्षणिक सहकार्य अधिक बळकट करत आहे. या सहकार्यांतर्गत शास्त्रज्ञ रिसायकलकॅरोच्या तांत्रिक आणि ऑपरेशन्स टीम्ससोबत ॲप्लाइड रिसर्च कार्यक्रमांवर जवळून काम करत आहेत. यासोबतच, शिकण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी आणि संशोधन जागतिक दर्जाच्या पद्धतींशी सुसंगत करण्यासाठी कंपनीने परदेशातील कंपन्यांशीही भागीदारी केली आहे.

हे नवीन केंद्र जबाबदार संसाधन पुनर्प्राप्ती क्षेत्रातील रिसायकलकॅरोच्या स्थापित कामगिरीवर आधारित आहे. 13 वर्षांहून अधिक अनुभवासह, कंपनीने भारतातील काही आघाडीच्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड्ससोबत काम करून त्यांच्या ई-कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन केले आहे. याशिवाय, रिसायकलकॅरो देशभरात सुमारे 1,200 टचपॉइंट्स चालवते, ज्यामुळे भारताला अधिक शाश्वत आणि परिपत्र संसाधन व्यवस्थेकडे वाटचाल करण्यास मदत होत आहे.

## संत सावता इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी -अनिल ससाने :** बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील संत सावता इंग्लिश स्कूल व ज्युनिअर* कॉलेज मध्ये हळदी कुंकू व स्नेहमिलन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वरचित गीत गायन, संगीत खुर्ची, उखाणे अशा विविध सादरीकरनातून उपस्थित महिलांचे मन जिंकली.



या कार्यक्रमाच्या स्पर्धा मध्ये प्रथम क्रमांक छाया अमोल लंबे, दिवतिय क्रमांक तहसीलदार सीमा दिवटे मॅडम नी पटकावला व तृतीय क्रमांक प्रतिभा झोटे यांनी पटकावला व यांना *शाळेच्या* *संचालिका सौ.जयश्री बळीराम जाधव मॅडम* *यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण* *करण्यात आले* , प्रत्येक सहभागी महिला पालकांना ,प्रमुख पाहुण्याना , शाळेतील सर्व महिला शिक्षिकांना भेट वस्तू दिल्या.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सिंदखेडराजा च्या कर्तव्य दक्ष तहसीलदार..सिमा दिवटे मॅडम, डॉ. रजनी म्हस्के, प्रतिभा अतिष तायडे, सोनल दीपक ठाकरे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. शीतल सांगळे मॅडम,ॲड कल्याणी राणी अभिजित सिंग राजे जाधव, डॉ. संगीता मुरकुट तसेच पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बळीराम जाधव सर, शाळेच्या संचालिका सौ.जयश्री बळीराम जाधव, शाळेचे सदस्य शहाजी मेहेत्रे, अभिजित मेहेत्रे तसेच शाळेचे प्राचार्य प्रा .सुधाकर गोफणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सह - शिक्षक कर्मचारी कु. वैष्णवी अंभोरे, रूक्मिणी तौर, कु.पायल पवार, दिपाली सातपुते,तेजराव घुगे, मनिष बुंधे आदींनी परिश्रम घेतले..

## उरण, पनवेलमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

### कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत उमेदवारांच्या मागे खंबीरपणे उभे

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर :** कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या मागे खंबीरपणे उभे आहेत. बुधवारी त्यांनी पनवेल, उरणमध्ये पंचायत समिती आणि जिल्हा परिषद उमेदवारांचे अर्ज दाखल केले.



"स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत कार्यकर्त्यांत अधिक उत्साह असतो. कार्यकर्त्यांच्या भावना विचारात घेऊन उमेदवार उभे केले आहेत," असे महेंद्रशेठ घरत म्हणाले.

"उरणमध्ये प्रचंड असंतोष आहे. दिबांचे नाव अद्यापही विमानतळाला दिले गेले नाही. पाणी समस्याही गंभीर आहे. रस्त्यांचा प्रश्न बिकट आहे, त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मैदानांचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे उरण, पनवेलच्या जनतेचा कौल महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मिळेल," असा विश्वास कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, बाळाराम पाटील, उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, वसंत काठावले, नंदराज मुंगाजी, मुरलीधर ठाकूर आणि कॉंग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## इयत्ता १० वी (SSC) विद्यार्थ्यांसाठी MKCL द्वारा परीक्षेची तयारी मार्काची भरारी विशेष कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/भंडारा :** तालुक्यातील दवडीपार बाजर येथील आदर्श विद्यालय मध्ये सनराईज कंप्युटर च्या सहकार्याने इय्यता १० वी चे मार्च २०२६ मध्ये बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित कडून तयार केलेला परीक्षेची तयारी आणि मार्कांची भरारी हा विशेष उपक्रम १९ जानेवारी २०२६ ला घेण्यात आला. इयत्ता १० वी ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील





अत्यंत महत्त्वाची पायरी असल्यामुळे, SSC परीक्षेची तयारी अधिक प्रभावी व्हावी या उद्देशाने MKCL कडून दोन महत्त्वाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ते म्हणजे SSC Smart Tips Course (परीक्षेची तयारी मार्कांची भरारी) आणि नमूना प्रश्नपत्रिका व आदर्श उत्तर संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यात विद्यार्थ्यांना उत्तम मार्क मिळवण्यासाठी स्मार्ट टिप्स, उत्तरपत्रिका सोडवण्याचे स्मार्ट तंत्र, दहावींच्या सर्व विषयांसाठी स्मार्ट टिप्स, परीक्षेचे वेळ व्यवस्थापन, इयत्ता १० वी नंतरच्या करिअर मार्गदर्शनाचा समावेश प्रोजेक्टर द्वारे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला विद्यालयाचे प्राचार्य मारोती लांजेवार सर यांनी विद्यार्थ्यांना याचे महत्व काय असते हे पटवून देऊन एम. के. सी. एल. भंडारा वरून आलेल्या कु. निकिता तोरंवार यांनी प्रेझेंटेशन च्या द्वारे संम्पूर्ण माहिती दाखविली. महत्वाचे विडिओ आणि Ai चे टूल्स समजावून सांगण्यात आले. त्यावेळेस शाळेचे शिक्षक श्याम गावळ, टेम्भूर्णे मॅडम, हजारे मॅडम , सनराईज कंप्युटर चे संचालक विलास बांडेबुचे तसेच कु. आचल आजबले, तृप्ती तिजारे, किरण सार्वे या ठिकाणी उपस्थित होते.

## दहावी व बारावीच्या परीक्षेला सामोरे जाताना

इयत्ता दहावी व बारावीच्या मित्रांनो , कसे आहात? मजेत आहात ना? आणि असलेच पाहिजे, मुलांनो आता फक्त तुम्हाला कबुतराचा डोळाच दिसतोय ना? म्हणजेच फक्त बोर्डाची परीक्षा दिसत असेल ना? आणि हो तुम्ही परीक्षेला घाबरत नाही ना, मला माहित आहे तुम्ही कोणीही परिक्षेला घाबरणार नाही, कारण परीक्षेला कोण घाबरते, ज्यांचा अभ्यास झाला नसेल तेच घाबरतात. तुमच्या सर्वांची शाळा व कॉलेजने उजळणी करून घेतली आहे, तसेच सराव परीक्षा घेतल्या आहेत, तुमच्या अभ्यासाचे नियोजन ही करून दिलेले आहे, आणि सराव परीक्षेचे पेपर सुद्धा तुम्ही बघितलेले आहेत.म्हणजे आता आपण कुठे बरोबर आहे, कुठे कमी पडतो हे माहीत झाले आहे, त्याप्रमाणे पुढील अभ्यासाची दिशा ठरवा,त्या प्रमाणे अभ्यास करा, बस एवढंच करायचं आहे आणि भरघोस मार्क मिळवायची, आणि चांगली मार्क मिळणारच हे नक्की आहे, कारण आई व वडील आणि शिक्षक यांचे आशीर्वाद पण आहेत.

आणि हो काही जणांचा, काही कारणांमुळे अभ्यास झाला नसेल, तर त्यांच्या मनावर मात्र आता हॉल तिकीट पाहून ताण आला असेल, की आता काय करायचं, पण बाळांनो अजिबात घाबरू नका, कारण आपण खूप कमी वेळेत सुद्धा इकडची दुनिया तिकडे करू शकतो, ही तर फक्त बोर्डाची परीक्षाच आहे ना,

बर ऐका आता काय करायचं ते,आता तुम्ही फक्त परिक्षेपर्यंतच्या उरलेल्या दिवसांचे व विषयांच्या अभ्यासाचे तंतोतंत नियोजन करा, अवघड वाटणारे व सोपे वाटणारे विषय यांना किती दिवस मिळतात ते मोजून ठरवा, तुम्हाला महत्त्वाचा वाटणारा असा मोजकाच अभ्यास करा किंवा , तुम्हाला प्रश्नपत्रिकेचे स्वरूप माहीती आहे त्याप्रमाणे तीन ते चार प्रश्नपत्रिका मन लावून व बघून सोडवा आणि एक प्रश्नपत्रिका वेळ लावून न बघता सोडवा, तुम्हाला खूपच समाधान वाटेल आणि परीक्षेसाठी तुमच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. कोणते प्रश्न सोडवायचे हे नक्की ठरवा व तेवढाच अभ्यास करा. तुम्ही सगळेजण नक्की पास होणारच यामध्ये काहीही शंका नाही. कष्टाला पर्याय नाही हे मात्र नक्की लक्षात असू द्या. जर यामध्ये काही अडचण येत असेल तर आपल्या विषय शिक्षकाना भेटा किंवा संपर्क करा आणि मार्गदर्शन घ्या, ते तुम्हाला नक्कीच मदत करतील कारण ते शिक्षक आहेत.

**श्री जे. के. कुंभार सर B.Sc.M.ed.D.S.M. (माजी पर्यवेक्षक के. आ.बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल.)**

## शिरूर तालुक्यातील रुपुरमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी; - वनविभाग जीवित हानी होण्याची वाट पाहतो की काय?

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** तालुक्यातील रुपुर शिवारामध्ये दुपारी कापूस वेचणीचे काम करत असताना शेतकरी महिलेवर बिबट्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात सदर महिला जखमी झाली असून तिला शिरूर येथील आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती सध्या स्थिर असल्याची डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

शिरूर कासार तालुक्यात अनेक दिवसापासून बिबट्याचा संचार चालू असून अधून मधून बिबट्याचे दर्शन कुठे ना कुठे होत असते. याबाबतीत वनविभाग पूर्णपणे गाफील आहे. वनविभाग जीवित हानी होण्याची वाट पाहतो की काय? असा प्रश्न सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. आज शिरूर कासार तालुक्यातील रुपुरच्या शिवारात मनकर्णा शिवराम नेटके या ५५ वर्षीय शेतकरी महिलेवर कापूस वेचणी करत असताना बिबट्याने हल्ला केला. तिचा आवाज ऐकून जवळच्या शेतात काम करणाऱ्या इतर महिलांनी तिकडे धाव घेतल्यामुळे पुढील अनर्थ टळला. जखमी महिलेवर शिरूर कासार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू असून तिची




प्रकृती स्थिर आहे.

वन विभागाने यापूर्वीही शिरूर तालुक्यात किती बिबटे आहेत? याची संख्या सांगण्यास टाळाटाळ केलेली आहे. वन विभागाच्या या भूमिकेवर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. सध्या रात्री शेत भिजवण्याचे काम शेतकरी करत असतात काही अनर्थ झाल्यास वनविभाग जबाबदारी स्वीकारेल काय?

ट्रॅप कॅमेरा बसवण्यात येईल

पाटोदा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल घोडके यांनी सांगितले की, या परिसरात ट्रॅप कॅमेरा लावून अधिवास निश्चित करण्यात येईल. अधिवास निश्चित झाल्यानंतर पिंजरा बसवण्यात येईल.

**वनविभागाची झोप कधी उडणार?**

बैल गेला आणि झोपा केला अशा पद्धतीने वन विभागाचे अधिकारी वागत आहेत. कोणत्याही बाबतीत कसलेही गांभीर्य नसल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून येते. बिबट्या आपल्या शिकारीच्या शोधात सतत भटकत असतो. तो इतर ठिकाणी गेल्यानंतर तुमचा पिंजरा काय कामाचा असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

# रेवदंडा बीचवर गोवा-सारखा धुमाकूळ

## तरुणाई रिमझिम थंड सिप,पेग, 'दम मारो दम' गाण्यांवर मग्न, पार्टनरसह नो लिमिट जल्लोष!

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** कोकणातील रेवदंडा बीचवर गोवा बीच-सारखा मनमुराद आनंद घेण्यासाठी तरुणाईची लाट उसळली आहे. सूर्योदय-सूर्यास्त पाहत समुद्रकिनारी रिमझिम थंडगार सिपचा (पेग ) आस्वाद घेत 'दम मारो दम' धूर काढत सारख्या गाण्यांवर डीजे म्युझिक, डान्स आणि बोनफायरने धुंदीत मग्न होऊन रात्रभर जल्लोष साजरा करतायत. आपल्या पार्टनरसह सर्व सुखद आनंद घेताना कुणाच्याही बंधनाची पर्वा न करता "कसलच भान नाही, फक्त शुद्ध धमाल!" अशी जोरदार चर्चा पर्यटक आणि स्थानिकांमध्ये सुरू आहे.तरुणाईचा गोवा-सारखा उत्सवहिरवीगार नारळी पोफळींच्या सावलीत अथांग किनाऱ्यावर टेंट्समध्ये राहत तरुणाई पार्टनरसह वनडे



पिकनिकचा मनमुराद आनंद घेतेय. समुद्राच्या लाटा ऐकत रिमझिम थंड गार पेगचा (सिप) आनंद घेत, विविध गाण्यांवर डान्स, बीच गेम्स आणि आरबीक्यूने गोवा-स्टाईल पार्टी चालू आहे. "आयुष्यातील हा धुंदी अनुभव विसरता येणार नाही!" असा उत्साह मुंबईतील तरुण गटाने व्यक्त केलाय. नो लिमिट वातावरणात रात्रभर जागरण, सूर्योदयाची वाट पाहत आनंदाचा थरार वाढतोय.स्थानिक रोजगार आणि शासनाचा आधार या धुमाकूळामुळे रेवदंडा ग्रामस्थांना टेंट व्यवस्था, खाद्यपदार्थ, म्युझिक सिस्टीम आणि गाईड सेवांमुळे भरपूर रोजगार मिळतोय. शासनाच्या कोकण पर्यटन विकास योजनेंमुळे वीज, स्वच्छता, सुरक्षा आणि रस्ते सुधारल्याने व्यवसायाला चालना मिळालीय. महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक धोरणांमुळे (महसूल आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने) कुठल्याही त्रासाशिवाय पर्यटकांचा ओढा वाढलाय, ज्यामुळे गावकऱ्यांच्या हाताला काम आणि विकासाला नवी गती लाभलीय.हृदयस्पर्शी पर्यटन तेज रेवदंडा बीचचा हा गोवा-सारखा जल्लोष पर्यटकांच्या चर्चेतून देशभर पसरतोय. शासनाच्या प्रोत्साहनामुळे (पर्यटन विभागाच्या सजगतेमुळे) हे निसर्गरम्य स्थळ पर्यटन नकाशावर चमकू लागलंय. तरुणाईच्या धुंदी आनंदाने कोकणाची ओढ वाढतेय!

# सिल्लोडमध्ये 'इरा'च्या शिलेदारांचा रणसंग्राम

## 'खेळ-खेलमे.. उडान' महोत्सवात पालकांनीही गाजवलं मैदान!

## विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू क्रीडा कौशल्याने प्रेक्षक भारावले

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** मैदानावर उडालेला धुरळा, चिमुकल्या खेळाडूंचा ओसंडून वाहणारा उत्साह आणि आपल्या पाल्याचा वेग पाहून पालकांनी दिलेली दाद... अशा अत्यंत चैतन्यमय वातावरणात सिल्लोड येथील नामांकित इरा नेक्सस सीबीएसई स्कूल आणि नेक्सस सेमी स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव 'खेळ-खेलमे.. उडान' नुकताच मोठ्या दिमाखात पार पडला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी केवळ पदकेच जिंकली नाहीत, तर आपल्या शिस्तबद्ध सादरीकरणाने उपस्थित सिल्लोडकरांची मनेही जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रवीण शिंदे (संचालक, के.आर.एस. अकॅडमी, छत्रपती संभाजीनगर), डॉ. मधुकर दांडगे (राष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षक) आणि माने सर (प्रसिद्ध कबड्डी प्रशिक्षक) यांच्या हस्ते क्रीडा



ज्योत प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी शाळेचे संचालक सिद्धेश्वर आहेर, गजानन गव्हाणे आणि अश्विनी आहेर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

महोत्सवाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सादर केलेले मार्च पास्ट (संचलन) आकर्षणाचे केंद्र ठरले. त्यानंतर धावणे, लांब उडी यांसारख्या मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी विजेच्या वेगाने धावत आपली चपळता सिद्ध केली. खो-खो, कबड्डी यांसारख्या सांघिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखवलेली रणनीती आणि जिद्द एखाद्या व्यावसायिक खेळाडूला साजेशी होती.

या क्रीडा महोत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे केवळ विद्यार्थीच नव्हे, तर त्यांच्या पालकांसाठीही विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी अनेक पालकांनी ट्रॅकवर धावत स्पर्धेत भाग घेतला. मुलांनीही टाळ्यांच्या कडकडाटात आपल्या पालकांचे मनोबल वाढवले, ज्यामुळे मैदानावर एक कौटुंबिक आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

"विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाचे स्थान अढळ आहे. मैदानावर मिळणारा विजय आत्मविश्वास देतो, तर पराभव जिद्द शिकवतो. 'इरा' समूहाने आयोजित केलेला हा उपक्रम भविष्यातील राष्ट्रीय खेळाडू घडवण्यासाठी मैलाचा दगड ठरेल," असे गौरवद्गार मान्यवरांनी आपल्या भाषणात काढले.

हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी इरा ग्रुपच्या सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विजेत्या खेळाडूंचा आणि पालकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलन 2026, मुंबई चित्रकर्मी महाउत्सव!!

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग :** आवाहन मराठी चित्रपटसृष्टी ही केवळ मनोरंजनाची साधन नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा, भाषेचा आणि सामाजिक विचारांचा कणा आहे. या सृजनशील परंपरेला नवी दिशा, नवे बळ आणि एकसंध व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलन २०२६, मुंबई आयोजित करण्यात येत आहे.

**हे संमेलन म्हणजे —**

निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, लेखक, तंत्रज्ञ, वितरक, अभ्यासक, चित्रपट निर्मिती क्षेत्रातील प्रत्येक घटक आणि विद्यार्थी यांचे राष्ट्रीय स्तरावरील एकत्रित विचारमंथन

मराठी चित्रपट उद्योगातील समस्या, संधी, धोरणे आणि भविष्यासाठी दृढ मार्गदर्शन

नव्या पिढीसाठी प्रशिक्षण, रोजगार, गुंतवणूक आणि पारदर्शक व्यवस्थेची भक्कम पायाभरणी "चित्रकर्मी महाउत्सव" हा केवळ कार्यक्रम नसून, तो आहे मराठी सिनेसृष्टीच्या एकजुटीचा, स्वाभिमानाचा आणि



भविष्याच्या निर्धाराचा उत्सव.

**आमचे नम्र आवाहन**

सर्व चित्रकर्मी, संस्था, संघटना आणि रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे या ऐतिहासिक संमेलनाला आपली उपस्थिती, विचार, अनुभव आणि पाठबळ द्यावे

मराठी चित्रपटसृष्टीला शाश्वत, सक्षम आणि जागतिक पातळीवर नेण्यासाठी एकत्र यावे

चला, एकत्र येऊया.

चला, मराठी चित्रपटसृष्टीचे भविष्य घडवूया.

अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलन २०२६ – मुंबई.

चित्रकर्मी महाउत्सव!!

मराठी सिनेसृष्टीचा अभिमान, महाराष्ट्राचा मान!

# माता रमाई जयंतीच्या अध्यक्षपदी करण पाडेवार, सचिवपदी प्रदीप पहाडे तर उपाध्यक्षपदी धम्मपाल खंडागळे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या 128 व्या जयंतीनिमित्त परतूर शहरातील भीमसैनिकांची बैठक "धम्मदीप बुद्ध विहार,"प्रबुद्ध नगर येथे पार पडली. या बैठकीत सर्वानुमते कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी करण पाडेवार, सचिवपदी प्रदीप पहाडे व उपाध्यक्षपदी धम्मपाल खंडागळे तर कोषाध्यक्षपदी रोहन अंभोरे यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना उपस्थितांनी पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या विचारांचा व त्यागाचा प्रचार-प्रसार व समाजहिताचे कार्य अधिक जोमाने करण्याचा



निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या128 व्या जयंतीनिमित्त परतूर येथे आयोजित बैठकीत नवनिर्वाचित कार्यकारिणीसह स्वप्नील पहाडे, विकास वेडेकर,अविनाश पाडेवार, गुलाब बंड, सिद्धार्थ पानवाले, सन्नी गायकवाड, मनोज वंजारे, दिपक पंडीत,प्रशांत वाकळे, सचिन साळवे प्रविण प्रधान,आकाश राक्षे, कुमार लांडगे, शुद्धोधन खंडागळे, केतन खंदारे,संतोष साळवे तसेच परतूर शहरातील भीम अनुयायी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# भाजप नागपूर शहर'पॉलिसी अँड रिसर्च टीम'च्या अध्यक्षपदी सुलभ देशपांडे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** भारतीय जनता पार्टी,नागपूर शहरच्या वतीने शहराच्या धोरणात्मक विकासासाठी आणि अभ्यासू राजकारणाला गती देण्यासाठी 'पॉलिसी अँड रिसर्च टीम'ची(PRT)घोषणा करण्यात आली असून,या टीमच्या अध्यक्षपदी सुलभ देशपांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भाजप नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी नियुक्ती पत्रक देऊन ही घोषणा केली असून. या महत्त्वपूर्ण जबाबदारीअंतर्गत सुलभ देशपांडे हे नागपूर शहराशी संबंधित



धोरणात्मक विषय,संशोधनाधारित अभ्यास तसेच प्रलंबित नागरी समस्यांवर पक्षाच्या वतीने तांत्रिक आणि अभ्यासपूर्ण कार्य करतील.या टीममध्ये सुलभ देशपांडे यांना सहकार्य करण्यासाठी प्रशांत रायपूरकर व हुजेफा धामणगाववाला यांची 'सह-प्रभारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तर सदस्यपदी गोपी मोरघडे,श्रीकांत अर्धापुरकर, डॉ.रविकांत भारद्वाज,आर्किटेक्ट संदीप पथे,देवाशीष अग्रवाल,शुभम शुक्ला आणि हरि बाहेती या तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.या नियुक्तीमुळे नागपूर शहराच्या प्रश्नांना एक अभ्यासपूर्ण व्यासपीठ मिळेल,असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर जनसंपर्क विभाग प्रवास व पर्यटन विभागातर्फे 'नेचर ट्रेल'चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागात राष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांकरिता 'नेचर ट्रेल' चे आयोजन गोरेवाडा बायोडायव्हर्सिटी पार्क येथे करण्यात आले.

या 'नेचर ट्रेल'



मध्ये विद्यार्थ्यांना जैव विविधतेकडे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून बघताना प्रात्यक्षिक स्वरूपात गोरेवाडा येथील पक्षी, प्राणी, जलिय पक्षी, औषधिजन्य वनस्पती यांचा अभ्यास करता आला.

या क्षणी विद्यार्थ्यांना अरण्य, प्राणी आणि वनस्पती बद्दल ची माहिती सेवानिवृत्त वन अधिक्षक केशव मेश्राम यांनी दिली तर पक्षांबद्दलची माहिती प्रा. शोभना मेश्राम यांनी दिली.

या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे, डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. नेहा दुबे, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. परिमल सुराडकर, प्रा. शोभना मेश्राम आणि एम. ए. द्वितीय आणि चतुर्थ च्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ पुणे संलग्न श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय भवानीनगर येथील श्री छत्रपती मंगल कार्यालय येथे रविवार दि.18 जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री छत्रपती कारखान्याचे संचालक अनिल काटे आणि शिवाजीराव निंबाळकर सतीश देवकाते निलेश टिळेकर संचालिका सुचिता सपकळ प्राचार्या शिवाली माने देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी विध्यार्थीनी यांनी महाराष्ट्राची लोकधारा असलेल्या लावणी पारंपरिक नृत्य गाणे पाहून संचालक अनिल काटे शिवाजीराव निंबाळकर निलेश टिळेकर यांनी ग्रामीण भागातील मुला मुलींना वाव देण्यात आल्यामुळे व महाविद्यालय स्थापनेपासून पहिल्यांदाच स्नेहसंमेलन जल्लोष 2026 असा सुंदर उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल सर्व प्राध्यापक व विध्यार्थी यांचे कौतुक करण्यात आले.प्राचार्या शिवाली माने देशमुख यांनी महाविद्यालयातील होत असलेल्या कामाचा आपल्या भाषणात अहवाल सादर केला. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.नम्रता सपकळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सावळे पाटील यांनी केले.या कार्यक्रमासाठी विध्यार्थी पालक महिलांनी आंनद घेतला यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# परस्पर राजकीय शत्रू,पण घराणेशाही मात्र समान !; इंदापूर तालुक्यात कार्यकर्त्यांची निवडणुकीत कोंडी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील राजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून दत्तात्रय भरणे आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे परस्परांचे कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून ओळखले जातात. मात्र, आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोघांच्या राजकीय भूमिकांमध्ये एक समान धागा स्पष्टपणे दिसू लागला आहे — तो म्हणजे घराणेशाही. तालुक्यातील अनेक निष्ठावान कार्यकर्ते वर्षानुवर्षे पक्षासाठी झटत असताना, उमेदवारी मात्र थेट नेत्यांच्या कुटुंबीयांनाच मिळत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

"आम्ही फक्त सतरंज्या उचलायच्या का?" असा प्रश्न आता उघडपणे विचारला जाऊ लागला आहे.



**भरणेंचे चिरंजीव पंचायत समितीच्या रिंगणात**

बोरी (ता. इंदापूर) येथून आमदार दत्तात्रय भरणे यांचे चिरंजीव पंचायत समिती सदस्य पदासाठी उभे राहण्याच्या तयारीत आहेत.स्थानिक पातळीवर अनेक अनुभवी,पक्षनिष्ठ कार्यकर्ते असतानाही, उमेदवारी थेट कुटुंबातच राहणार असल्याचे संकेत मिळाल्याने नाराजीचा सूर वाढला आहे.

"गावागावांत पक्ष वाढवण्यासाठी आम्ही मेहनत घेतली,पण संधी मात्र नेत्यांच्या घरातच,"अशी भावना अनेक कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

**पाटीलांची कन्या जिल्हा परिषद मैदानात**

दुसरीकडे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या बावडा गटातून जिल्हा परिषद सदस्य पदासाठी निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. पाटील गटातील कार्यकर्त्यांनी यापूर्वी अनेक आंदोलने, निवडणुका आणि संघटनात्मक कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली असली, तरी उमेदवारी मात्र पुन्हा एकदा घरातील सदस्यालाच मिळणार असल्याची चर्चा आहे.

यामुळे पाटील गटातील काही ज्येष्ठ कार्यकर्तेही अंतर्गत नाराजी व्यक्त करत आहेत.कार्यकर्त्यांची कोंडी, नेतृत्वाचा एकांगी निर्णय?दोन्ही गटांत कार्यकर्त्यांचे प्रश्न, स्थानिक नेतृत्वाची घुसमट आणि निर्णयप्रक्रियेत सहभागाचा अभाव हा मुद्दा ठळकपणे समोर येत आहे.राजकीय शत्रुत्व असले तरी घराणेशाहीच्या बाबतीत दोन्ही नेते एकाच वाटेवर असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

"पक्ष वाढवायचा असेल तर कार्यकर्त्यांना संधी द्यावी लागते. केवळ कुटुंबीयांनाच उमेदवारी दिल्यास कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची होते,"असे मत राजकीय अभ्यासक व्यक्त करत आहेत.

लोकशाही की वारसाहक्क?स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या लोकशाहीचा पाया मानल्या जातात. मात्र, त्या देखील वारसाहक्काने चालवल्या जात असतील,तर सर्वसामान्य कार्यकर्त्यांना पुढे येण्याची संधीच उरत नाही,अशी भावना आता इंदापूर तालुक्यात ठळक होत आहे.

आगामी निवडणुकीत मतदार काय भूमिका घेतात आणि कार्यकर्त्यांची नाराजी मतपेटीत उतरते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# पाठलाग पळापळ अन् बेड्या....!

## वराह चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीवर भोकरदन पोलिसांची सिनेस्टाईल धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र/राजु शिंदे :** भोकरदन शहरात पाळीव वराह चोरीच्या घटनांनी नागरिकांत अस्वस्थता निर्माण केली असतानाच भोकरदन पोलिसांनी आंतरराज्य सराईत टोळीचा थरारक पद्धतीने पर्दाफाश करत मोठे यश मिळवले आहे. दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी वराह चोरीप्रकरणी गु.र.नं. १९/२०२६, कलम ३०३(२) भा.दं. सं. अन्वये अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी तपासाची सूत्रे हाती घेत पो.उपनि. पवनसिंग राजपूत यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार केले.२१ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता गुप्त खबऱ्यामार्फत संशयास्पद पिकअप (क्रमांक MH 37 T 3520) भोकरदन शहरात फिरत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ हालचाली केल्या.

**(1)सिनेस्टाईल पाठलाग**

जाफ्राबाद रोडवरून जाणाऱ्या पिकअपचा पोलिसांनी पाठलाग केला. माहोरा चौकात ट्रॅक्टर लावून अडथळा उभा केला असता चालकाने यू-टर्न घेत भोकरदनकडे पळ काढला. अखेर विरेगाव परिसरात वाहन अडवण्यात आले.मात्र अंधाराचा फायदा घेत सात आरोपी पळून जात असताना नरेंद्रसिंग लोंढा (रा. अहमदाबाद, गुजरात) याला शेतातून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत पो.अं. लक्ष्मण राणगोते जखमी झाले.



**(2)बसमध्येही सापळा..!**

फरार आरोपींचा पाठलाग सुरूच ठेवत पोलिसांनी कुंभारी पाटी–जालना बसमध्ये चढलेल्या चार आरोपींवर नजर ठेवली.केदारखेडा येथे बस थांबवून अनिलसिंग जसरतसिंग आंद्रेले व गोलुसिंग कन्हैयासिंग आंद्रेले यांना अटक करण्यात आली.इतर दोघांनी बसच्या मागील खिडकीतून उडी मारून मक्याच्या शेतात पळ काढला; मात्र अशोक सटवा बोकडे व विजय बापू जाधव (दोघे रा. अहमदाबाद, गुजरात) यांनाही पकडण्यात आले.

**(3)छत्रपती संभाजीनगरात अंतिम अटक**

उर्वरित आरोपी सिल्लोडमार्गे छत्रपती संभाजीनगर येथे गेल्याची माहिती मिळताच मध्यवर्ती बसस्थानकात सापळा रचून किरण बाबू बोकडे (रा. अहमदाबाद, गुजरात) व महादू वसंत कवाडे (रा. कारंजा लाड, जि. वाशिम) यांना ताब्यात घेण्यात आले.

**(4)घातक साहित्य जप्त**

पिकअपची झडती घेतली असता वराह पकडण्यासाठीचे दोर,जाळी, दगडांनी भरलेले पोते तसेच धारदार पाते असलेल्या दोन तलवारी आढळून आल्या.पाठलाग झाल्यास दगडफेक करण्यासाठी ही तयारी असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपींविरुद्ध आर्म ॲक्ट अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपींवर यापूर्वीही घरफोडी,मारहाण यासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

**(5)पोलीस पथकाची उल्लेखनीय कामगिरी**

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल,अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी व उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक किरण बिडवे,पो.उपनि. पवनसिंग राजपूत,पो.उपनि. सागर शिंदे, प्रशांत उबाळे,विकास जाधव, किशोर मोरे, लक्ष्मण राणगोते,योगेश सिंगल,संदीप भुतेकर, अर्जुन टेकाळे,तसेच माहोरा व भोकरदन पोलीस मित्रांनी धाडस दाखवत ही कामगिरी यशस्वी केली.

# 'ऑस्करसाठी लॉबीईंग करण्याइतके पैसे आमच्याकडे नाही' - 'दशावतार' लेखक दिग्दर्शक सुबोध खानोलकर!

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाचा क्षण म्हणजे 'दशावतार'ची ऑस्करसाठी निवड होणे. भारतीय संस्कृतीतील विष्णूंच्या दहा अवतारांवर आधारित ही कलाकृती आपल्या समृद्ध परंपरेचे प्रभावी दर्शन घडवते. पौराणिक कथानकाला आधुनिक सादरीकरणाची जोड देत चित्रपटानं जागतिक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या चित्रपटातील दिग्दर्शन, संगीत आणि तांत्रिक बाजू आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आहेत. मराठी सिनेमाची कलात्मक उंची आणि आशयाची ताकद 'दशावतार'मुळं पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर २७ कोटींचा व्यवसाय केला आहे. चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर देखील खूप गाजत आहे. हा चित्रपट खूप कमी बजेटमध्ये तयार करण्यात आला आहे. 'दशावतार'च्या दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांनी अशी गोष्टी ईटीव्ही भारतच्या मुलाखतीमध्ये सांगितली, ज्यामुळं तुम्हाला आश्चर्य होईल. आता त्यांनी मुलाखतीमध्ये सांगितलं की, त्यांच्याकडे इतके पैसे नाहीत की, ऑस्करसाठी लॉबीईंग करू शकणार. दिग्दर्शकाचं बजेट कमी असताना देखील त्यांनी इतक्या चांगल्या चित्रपटाची निर्मिती केली हे खरचं अभिमानास्पद आहे.

दरम्यान या चित्रपटाबद्दल अधिक काही गोष्टी जाणून घेण्यासाठी आमचे प्रतिनिधी कीर्तिकुमार कदम यांनी 'दशावतार'चे दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांना चित्रपटाच्या ऑस्कर वारीबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की, "अर्थात 'दशावतार'ची ऑस्करसाठी निवड झाली, हे समजल्यावर खूप आनंद झाला. सुरुवातीला ही बातमी खरी असेल यावर विश्वासच बसत नव्हता. परंतु जेव्हा त्यांचा ऑफिशियल मेल आला तेव्हा मन थोडे थाऱ्यावर आले. महत्वाचे म्हणजे ऑस्कर्सच्या ओपन कॅटेगिरी मध्ये निवड झालेला हा पहिला चित्रपट आहे. आणि माझ्या मते ऑस्करसाठी निवड होणे म्हणजे केवळ एका चित्रपटाचा गौरव नाही, तर संपूर्ण मराठी चित्रपटसृष्टीचा सन्मान आहे. या यशामुळं जागतिक व्यासपीठावर मराठी सिनेमा अधिक ठळकपणे पोहोचेल. 'दशावतार'नं भारतीय पौराणिक कथांना जागतिक ओळख मिळवून देण्याचा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे."

**ऑस्कर्ससाठी 'दशावतार'ची निवड :** जेव्हा एकदा चित्रपट ऑस्कर्ससाठी निवडला जातो, तेव्हा त्यासाठी लॉबीईंग करावं लागतं. त्यासंदर्भात बोलताना खानोलकर म्हणाले की, "हो, खरं आहे. परंतु ती प्रोसेस खूप खर्चिक आहे. अमेरिकेत जाऊन, तिथे तीन महिने थांड मारून बसून, सर्व ज्युरी मेम्बर्सकडे लॉबीईंग करण्यासाठी लागणारे पैसे आमच्याकडे नाहीयेत. परंतु आता ऑस्कर्स समितीनं एक ऍप लाँच केले आहे. साधारण ४-५ वर्षांपूर्वी ते सुरु झाले असून आम्ही त्यामार्फत १५०० ज्युरी मेम्बर्स पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहोत. तसेच सध्या सोशल मीडियाचा रिच वाढलेला असून आम्ही तिथेही 'दशावतार' प्रोमोट करीत आहोत.

**'दशावतार' प्रति लोकांचे प्रेम :** या चित्रपटाचे शूट कोकणातील दाट जंगलात झाले आणि त्याबद्दल सांगताना ते म्हणाले की, "मी स्वतः कोकणातला आहे, त्यामुळं मला या परिसराची जाणीव आहे. माझे आधीचे दोन चित्रपटही कोंकण पार्श्वभूमी असलेले होते. 'दशावतार' या पारंपरिक उत्सवाबद्दल स्थानिक लोक खूप भावनिकरीत्या जोडलेले आहेत.



त्यांच्यासाठी ते फक्त नॅनोरंजनाचं साधन नसून देवाप्रती दर्शविणारी आस्था आहे. शेकडो वर्षांची ही परंपरा आजही पाळली जात आहे यावरून 'दशावतार' प्रति लोकांचे किती प्रेम आहे हे जाणवते. कालानुरूप कोंकणात बदल होत गेले आहेत. इथे रोडावत जाणारी जंगले हे पर्यावरणासाठी धोकादायक आहे आणि हेच आम्ही चित्रपटातून अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जंगलात शूट चॅलेंजिंग :** हा चित्रपट फक्त ५० दिवसांत पूर्ण झाला आणि कुडाळसह कोकण प्रदेशातील विविध ठिकाणी त्याचे चित्रीकरण करण्यात आले. जंगलात शूट करणे नेहमीच चॅलेंजिंग असते. माझ्या कथेत जंगल हे एका पात्राप्रमाणे आहे, त्यामुळं तिथे शूट करणे अनिवार्य होते. २५० जणांच्या क्रूचा ताफा महिनाभरासाठी तिथे सांभाळणे हे देखील एक चॅलेंज होते. परंतु प्रत्येकजण चित्रपटावरील निष्ठेपोटी इमानेइतबारे काम करीत होते. दिलीप (प्रभावळकर) काका यांच्या तब्येतीची काळजी घेत आम्ही शूटिंग व्यवस्थित पार पाडलं."

**चित्रपटात रंगभूषेला अतिशय महत्व :** 'दशावतार'मधील सर्व अवतार




पडद्यावर मनोवेधक दिसतात. त्याबद्दल प्रतिक्रिया देताना सुबोध खानोलकर म्हणाले की, "दशावतारमध्ये रंगभूषेला अतिशय महत्व आहे. तो स्टेजवर सादर करतानाचा मेक अप बऱ्यापैकी गडद असतो. चित्रपट करताना आम्हाला तोच मेक अप काही शेड्स कमी करावा लागला, कारण नेहमीच मेक अप स्क्रीनवर बटबटीत दिसला असता. आमचे मेक अप डिझाईनर रोहित महाडिक यांनी सगळ्या अवतारांचे अप्रतिम मेल अप केले आणि छायाचित्रकारानं ते उत्तमरीत्या प्रेसेंट केले. तसेच आमच्या आर्ट डिरेक्टरला देखील क्रेडिट जाते जातं, त्यांनी सर्व दृश्य नेटकी दिसण्यासाठी अपार मेहनत घेतली. दिलीप प्रभावळकरांची कौतुक करावे लागेल कारण त्यांनी तीन तीन चार चार तास तक्रारीविना बसून सर्व गेट अप्स करून घेतले."

**महेश मांजरेंजर यांनी काही गोष्टी सुचवल्या :** या चित्रपटात भरत जाधव, महेश मांजरेंजर, अभिनय बेर्डे, गुरु ठाकूर, विजय केंकरे सारखे मोठमोठे नट छोट्या छोट्या भूमिका करताना दिसले. त्याबद्दल सांगताना ते म्हणाले की, "आम्ही स्वतःला लकी समजतो की, या सर्वांनी चित्रपटात काम करण्यासाठी होकार दिला. प्रत्येक कलाकारानं विनाअट लुक टेस्ट दिली. एकानेही 'लुक टेस्ट कशाला?' हा प्रश्न विचारला नाही. त्यांना आपल्या भूमिकेच्या लांबीविषयी आणि कथेशी असलेल्या नात्याविषयी कल्पना होती. जंगलात शूट करताना सर्वच सोयीसुविधा उपलब्ध नसतात, तरीही कोणीही कशाचीही तक्रार केली नाही, हा त्यांचा मोठेपणा आहे. महेश सरांबद्दल सांगायचं झालं तर ते काही सुचवायचे. 'हे अशा पद्धतीने करून बघ, इम्पाक्ट चांगला येईल किंवा हे अमुक पद्धतीने करून बघ, दृश्यमानता वाढेल', असे फक्त सजेशन द्यायचे आणि खरोखरच त्या त्या सीनमधील परिणामिकता वाढलेली दिसायची. दिलीप सर वेळेत तयार असायचे आणि आपले काम चोख करायचे. एक महत्वाचे सांगतो की, जर प्रभावळकर यांनी या चित्रपटाला नकार दिला असता तर हा चित्रपट करणारच नव्हतो. त्यांच्या अभिनयाच्या ताकतीविषयी असलेली माझी श्रद्धा आतातर दुपटीनं वाढली आहे. भरत जाधवनं आपल्या अत्यंत व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढून शूट केले. विजय केंकरे यांनी देखील खूप छान सहकार्य दिलं. एकंदरीत हा चित्रपट सर्वांच्या साहाय्यामुळं इतका सुंदर झाला." पुढे काय असे विचारले असता सुबोध खानोलकर म्हणालं की, "डॉ तीन कथांवर विचारविनिमय सुरु आहे, परंतु सध्या 'दशावतार'च्या ऑस्करवारी मधेच खूप बिझी आहे."

## 'रणपति शिवराय स्वारी आग्रा'चा ट्रेलर रिलीज

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या शौर्य, पराक्रम आणि दूरदृष्टीनं मुघलांना कावरेबावरे करून सोडले होते. रयतेसाठी त्यांनी आपलं सर्वस्व अपर्ण केलं. गनिमीकावा, मुत्सद्दी वृत्ती, व्यवस्थापन कौशल्य आणि अष्टपैलू असणारे राजे महाराष्ट्राला लाभले, त्यामुळं राज्यात एकता निर्माण झाली. आता लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकरनं हे 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' हा चित्रपट येऊन येत आहेत. सध्या या चित्रपटाचा ट्रेलर हा रिलीज करण्यात आला आहे. या चित्रपटाच्या ट्रेलर खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. आजवर अनेक शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर अनेक चित्रपट बनली आहेत आणि त्यामधून प्रत्येकांना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत.

**'रणपति शिवराय स्वारी आग्रा' ट्रेलर रिलीज :** 'शिवाष्टका'मधील सहावे पुष्प विशेषतः शिवाजी महाराजांच्या औरंगजेबाच्या दरबारातील आग्र्याच्या




प्रसंगावर आधारित आहे. आता हा प्रसंग पुन्हा एकदा प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाचा ट्रेलर इतका दमदार आहे की, ज्यामुळं प्रत्येक महाराष्ट्राच्या मातीमधील लेकांचं रक्त सळसळ करेल. ट्रेलरमध्ये औरंगजेबाची क्रूरता दाखविण्यात आली आहे. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज भर सभेत औरंगजेबाला आव्हान देताना दिसत आहेत. याशिवाय ट्रेलरमध्ये काही युद्ध प्रसंग देखील दाखविण्यात आले आहेत. या चित्रपटाचा ट्रेलर खूप विशेष आहे. हा ट्रेलर आता अनेकांना पसंत येत आहे. ट्रेलरमधील प्रत्येक दृष्यांसाठी दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी खूप मेहनत घेतली आहे.

**'रणपति शिवराय स्वारी आग्रा' चित्रपटाबद्दल :** दरम्यान 'रणपती शिवराय स्वारी आग्रा'च्या ट्रेलर लाँचप्रसंगी पोवाडे सादर करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये चित्रपटाची टीम देखील हजर होती. हा चित्रपट ३० जानेवारी २०२६ जगभरातील चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची निर्मिती कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक (पॅनोरमा स्टुडिओज), मुरलीधर छतवानी (पॅनोरमा स्टुडिओज), जेनील परमार (मुगाफी) आणि विपुल अग्रवाल यांनी केली आहे.

हा एक मराठी ऐतिहासिक चित्रपट आहे. 'रणपति शिवराय स्वारी आग्रा'मध्ये अभिजीत श्वेतचंद्र हा गुणी कलावंत शिवरायांची भूमिका करताना दिसणार आहे. याशिवाय औरंगजेबची भूमिका समीर धर्माधिकारी साकारताना दिसणार आहे.

## रश्मिका-विजय पुन्हा चर्चेत, दोघांच्या नात्याबद्धल काय म्हणाली रश्मिका?

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील लोकप्रिय आणि चर्चेत असलेली जोडी रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. गेल्या काही वर्षांपासून या दोघांच्या नात्याबाबत विविध अफवा आणि तर्कवितर्क सोशल मीडियावर रंगत होते. मात्र आता या चर्चांना आणखी वेगळं वळण मिळालं असून, थेट त्यांच्या लग्नाच्या तारखेपर्यंत बातम्या पोहोचल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा 26 फेब्रुवारी रोजी राजस्थानमधील उदयपूर येथे विवाहबंधनात अडकणार असल्याची जोरदार चर्चा आहे. ऐतिहासिक वारसा, राजेशाही वातावरण आणि सुंदर लोकेशन्ससाठी प्रसिद्ध असलेल्या उदयपूरमध्ये हा विवाहसोहळा खासगी आणि भव्य पद्धतीने पार पडणार असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र या दोघांनी अद्याप अधिकृत घोषणा केलेली नसली, तरी चाहत्यांमध्ये या बातमीमुळे प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

दरम्यान, या सगळ्या चर्चांवर रश्मिका मंदानाने अखेर आपली प्रतिक्रिया दिली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत रश्मिकाला विजय देवरकोंडासोबतच्या नात्याबाबत थेट प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना ती म्हणाली, "गेल्या चार वर्षांपासून या गोष्टींबाबत सातत्याने चर्चा सुरू आहेत. योग्य वेळ आली की मी स्वतः यावर बोलेन." रश्मिकाचं हे संयमित आणि सूचक वक्तव्य सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, चाहत्यांमध्ये विविध तर्कवितर्कांना उधाण आलं आहे. तिने थेट नात्याची कबुली दिलेली नसली, तरी "योग्य वेळ" असा उल्लेख केल्यामुळे दोघांमध्ये नक्कीच काहीतरी खास नातं असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचं बोललं जात आहे.

